मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक युवक आधार मराठी






■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : २४३ ■ शनिवार, १६ मे २०२६ ■ किंमत : २ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514


# कामोठेत रंगणार 'मिनी महाराष्ट्र केसरी'

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :**भारतीय जनता पार्टीचे युवा नेते, पनवेल महापालिकेचे माजी सभागृहनेते व विद्यमान नगरसेवक परेश ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्याने दरवर्षीप्रमाणे यंदाही क्रीडाप्रेमींसाठी भारतीय जनता युवा मोर्चा कामोठे आणि रायगड जिल्हा कुस्ती असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार, दि. १८ मे २०२६ रोजी कामोठे मधील सेक्टर ०६ येथील लोकनेते रामशेठ ठाकूर विद्यालयाच्या भव्य मैदानावर "मा.श्री.परेशशेठ ठाकूर केसरी २०२६" या भव्य जंगी कुस्ती सामन्यांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती आज(दि. १५) येथे आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत आली. महाराष्ट्र केसरी प्रमाणे या ठिकाणी भव्य दिव्य स्वरूपात आयोजन असल्याने कामोठेत मिनी महाराष्ट्र केसरी रंगणार आहे आणि त्या अनुषंगाने कुस्तीचा थरार अनुभवायला मिळणार आहे.

पनवेल तालुका व शहर भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात भाजपचे महाराष्ट्र प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या पत्रकार परिषदेस भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, महापौर नितीन पाटील, रायगड जिल्हा कुस्ती असोसिएशनचे अध्यक्ष, पनवेल महापालिकेचे नगरसेवक परेश ठाकूर, नगरसेवक दिनेश खानावकर, सुमित झुंझारराव, आयोजक पनवेल महापालिकेचे नगरसेवक हॅप्पी सिंग आणि भाजपचे उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष मयुरेश नेतकर कुस्ती प्रशिक्षक रुपेश पावशे, कामोठे युवा मोर्चा अध्यक्ष तेजस जाधव, यांच्यासह पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कुस्ती सामन्यांच्या संदर्भात पुढे माहिती देताना परेश ठाकूर यांनी सांगितले कि, या सामन्यांचे उद्धाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते होणार असून यावेळी भाजपचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष रविंद्र चव्हाण, राज्याचे मत्स्यव्यवसाय आणि बंदरे विकास मंत्री नितेश राणे, भारतीय जनता युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक, आमदार महेश लांडगे यांची प्रमुख मान्यवर म्हणून उपस्थिती असणार असून प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे महाराष्ट्र प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार मंदाताई म्हात्रे, शिक्षक मतदार संघाचे आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, महापौर नितीन पाटील, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, सभागृहनेते प्रकाश बिनेदार, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, भाजपचे कामोठे मंडल अध्यक्ष विकास घरत, खारघर मंडल अध्यक्ष प्रवीण पाटील, कळंबोली मंडल अध्यक्ष अमर पाटील, पनवेल शहर मंडल अध्यक्ष सुमित झुंझारराव, नविन पनवेल मंडल अध्यक्ष दशरथ म्हात्रे, उत्तर मंडल अध्यक्ष दिनेश खानावकर, पूर्व मंडल अध्यक्ष भूपेंद्र पाटील, पश्चिम मंडल अध्यक्ष रुपेश धुमाळ यांच्यासह स्थानिक लोकप्रतिनिधींची उपस्थिती असणार आहे.



वाढदिवसानिमित्त कार्यक्रमातून प्रेरणा मिळावी यासाठी सामाजिक उपक्रम राबविले जातात. पनवेलमधील नागरिकांना राष्ट्रीय स्तरावरील कुस्ती सामने प्रत्यक्ष अनुभवता यावेत, महाराष्ट्राची पारंपरिक कुस्ती संस्कृती पुढील पिढीपर्यंत पोहोचावी आणि नवोदित खेळाडूंना प्रेरणा मिळावी, या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन सातत्याने करण्यात येत आहे. दरवर्षी हजारो क्रीडाप्रेमी या स्पर्धेला उपस्थित राहून मातीतील थरार अनुभवतात. या स्पर्धेत महाराष्ट्रासह पंजाब, हरियाणा, उत्तर प्रदेश आणि दिल्ली येथील नामांकित मल्ल सहभागी होणार आहेत. हिंद केसरी, महाराष्ट्र केसरी तसेच महिला कुस्तीपटूंचे विशेष सामने हे यंदाच्या स्पर्धेचे प्रमुख आकर्षण असणार आहे. या

## सोमवारी कामोठेत कुस्तीचा थरार

स्पर्धेतील एकूण विजेत्यांना १५ लाख ५५ हजार ५५५ रुपयांची पारितोषिके असणार असून यामध्ये प्रामुख्याने पुरुष गटात रुस्तम ए हिंद पै. सिकंदर शेख विरुद्ध पंजाबचा सुप्रसिद्ध मल्ल पै. लाली चमकोर, उपमहाराष्ट्र केसरी पै.किरण भगत विरुद्ध पंजाबचा सुप्रसिद्ध मल्ल पै.बागा सिंघ, ट्रिपल महाराष्ट्र केसरी पै.विजय चौधरी विरुद्ध हिंद केसरी पै.संदीप कुमार, महाराष्ट्र केसरी पै. दादा शेळके विरुद्ध उपमहाराष्ट्र केसरी पै.माउली कोकाटे यांचे तर महिला गटात पै.अमेघा घरत विरुद्ध राष्ट्रीय पदक विजेती पै.एकता शर्मा, राष्ट्रीय पदक विजेती पै.पलक यादव विरुद्ध उपमहाराष्ट्र केसरी पै.वेदांतीका पवार आणि नेपाळची सुप्रसिद्ध मल्ल पै.रुबी थापा विरुद्ध उत्तराखंडची सुप्रसिद्ध पै. कोमल यांच्यामध्ये सामने होणार असल्याचे परेश ठाकूर यांनी सांगितले. आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळणाऱ्या मल्लांचा या स्पर्धेत सहभाग असून एकूण ७५ सामने होणार असून स्थानिक मल्लांनाही प्राधान्य देण्यात आले आहे. दर्जेदार मैदान, प्रशस्त प्रेक्षक गॅलरी, वैद्यकीय तसेच आवश्यक अशा सर्व सुविधा या ठिकाणी असणार असल्याची माहिती परेश ठाकूर यांनी यावेळी दिली.

परेश ठाकूर यांनी पनवेल आणि रायगड परिसरातील सामाजिक, शैक्षणिक आणि क्रीडा क्षेत्रात सातत्याने उल्लेखनीय कार्य केले आहे. युवकांना सक्षम व्यासपीठ मिळावे, ग्रामीण भागातील प्रतिभेला संधी मिळावी आणि समाजात सकारात्मक ऊर्जा निर्माण व्हावी, या उद्देशाने त्यांनी विविध उपक्रमांना कायम प्रोत्साहन दिले आहे. पनवेल परिसरातील युवकांना सामाजिक कार्य, नेतृत्व आणि संघटन कौशल्याची प्रेरणा देण्यात त्यांचा मोठा वाटा राहिला आहे. विविध कला, क्रीडा, सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रमांमध्ये त्यांचा सहभाग नेहमीच उल्लेखनीय राहिला आहे. सर्वसामान्य नागरिकांशी जुळलेली आपुलकी आणि समाजाशी असलेले घट्ट नाते हीच त्यांची खरी ओळख मानली जाते. लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा सामाजिक वारसा समर्थपणे पुढे नेत असताना सामाजिक बांधिलकी, जनसंपर्क आणि माणुसकीची जपणूक हा परेश ठाकूर यांचा पिंड आहे. "समाजातील प्रत्येक घटकाला सोबत घेऊन विकास आणि संस्कारांची परंपरा जपणे" ही त्यांची भूमिका अनेक उपक्रमांतून सातत्याने दिसून येते. त्यामुळेच पनवेल परिसरात त्यांच्याबद्दल विशेष आत्मीयता आणि विश्वास आहे. समाजोपयोगी उपक्रमांमध्ये त्यांनी नेहमीच पुढाकार घेतला आहे. त्यामुळे परेश ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात येणारी ही स्पर्धा आज पनवेल तालुक्यातील एक प्रतिष्ठेचा आणि सर्वांच्या आकर्षणाचा क्रीडा महोत्सव बनली आहे. कुस्ती या महाराष्ट्राच्या पारंपरिक खेळाबद्दल असलेले त्यांचे विशेष प्रेम, खेळाडूंप्रती असलेला जिव्हाळा आणि क्रीडा क्षेत्राला दिलेले सातत्यपूर्ण प्रोत्साहन यामुळे "मा. श्री. परेशशेठ ठाकूर केसरी" कुस्ती स्पर्धेला राज्यभरात वेगळी ओळख निर्माण झाली आहे.

# सिल्लोड–सोयगाव मतदार संघातील वनविभागाशी संबंधित अडचणी दूर करण्याचे निर्देश

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी विजय काळे** : आज मुंबई येथे वनमंत्री गणेश नाईक यांची सिल्लोड–सोयगाव मतदारसंघाचे माजी मंत्री आमदार अब्दुल सत्तार यांनी भेट घेत मतदारसंघातील वनविभागाच्या अखत्यारित येणाऱ्या विविध रस्ते व विकास प्रकल्पांबाबत सविस्तर आणि सकारात्मक चर्चा केली.या बैठकीत विशेषतः सावळदबारा – पळसखेडा–टिटवी या महत्त्वाच्या रस्त्याच्या कामास वनविभागाच्या तांत्रिक अडचणीमुळे निर्माण झालेला अडथळा तातडीने दूर करून कामाला गती देण्याची मागणी करण्यात आली.यासोबतच मुर्डेश्वर,आमसरी तसेच इतर भागांतील सार्वजनिक बांधकाम विभाग,जिल्हा परिषद,प्रधानमंत्री ग्राम सडक योजना आणि मुख्यमंत्री ग्राम सडक योजना अंतर्गत येणाऱ्या वनविभागाशी संबंधित प्रलंबित प्रश्नांवरही सविस्तर चर्चा करण्यात आली.आमदार



अब्दुल सत्तार यांनी मतदारसंघातील नागरिकांच्या दृष्टीने हे रस्ते अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सांगत संबंधित कामे तातडीने सुरू करण्यासाठी वनविभागाने आवश्यक मंजुरी व सहकार्य द्यावे, अशी मागणी केली.यावर सकारात्मक प्रतिसाद देत वनमंत्री गणेश नाईक यांनी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देऊन वनविभागांतर्गत प्रलंबित रस्त्यांच्या कामांबाबत तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. त्यामुळे सिल्लोड–सोयगाव मतदारसंघातील रखडलेले रस्ते प्रकल्प लवकरच मार्गी लागण्याची आशा निर्माण झाली आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान; नियोजनभवनात समाधान शिबिर !!

## अभियानाद्वारे शेतरस्ते व प्रलंबित प्रश्न प्राधान्याने सोडवा - खासदार अनुप धोत्रे

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे/प्रतिनिधी** : 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियाना'च्या माध्यमातून नागरिकांच्या विविध तक्रारी व अडचणींचे निराकरण, तसेच नागरिकांना आवश्यक सेवा मिळण्याच्या प्रक्रियेला गती मिळाली आहे. ग्रामीण भागातील शेतरस्त्यांचे, तसेच इतर प्रलंबित प्रश्नही या माध्यमातून प्राधान्याने सोडवावेत, असे प्रतिपादन खासदार अनुप धोत्रे यांनी केले.

अकोला व कौलखेड मंडळासाठी नियोजनभवनात आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत समाधान शिबिराच्या उद्धाटनप्रसंगी ते बोलत होते.



आमदार वसंत खंडेलवाल, जिल्हाधिकारी वर्षा मीना, उपजिल्हाधिकारी विजय पाटील, महेश परंडेकर, जोगेंद्र कट्यारे, निखिल खेमनार, जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख भारती खंडेलवाल, उपविभागीय अधिकारी डॉ शरद जावळे, तहसीलदार कुणाल झाल्टे आदी उपस्थित होते खासदार श्री. धोत्रे म्हणाले की, नागरिकांचे आणि शेतकऱ्यांचे जमिनीशी, तसेच इतर संबंधित प्रश्न एकाच छताखाली व तातडीने निकाली काढणे यासाठी अभियान उपयुक्त आहे. ग्रामीण भागात शेतरस्त्यांच्या तक्रारी बराचकाळ प्रलंबित राहतात. सर्वेक्षण, सीमांकनामुळे या अडचणी दूर व्हायला मदत होईल. त्यादृष्टीने प्रयत्न करण्याचे निर्देश त्यांनी दिले. जिल्हाधिकारी श्रीमती वर्षा मीना म्हणाल्या की, महाराजस्व अभियानांतर्गत शिबिरांतून नागरिकांना आवश्यक सेवा, दाखल्यांचे वितरण, तसेच तक्रारींचे निराकरण गतीने होत आहे. सातबारा, आठ अ, फेरफार, तसेच विविध १५ हजारहून अधिक दाखल्यांचे वितरण आतापर्यंत झाले आहे. यापुढेही मोहिम स्तरावर काम करून नागरिकांना सेवा मिळवून देण्याचा प्रयत्न राहील.अकोला तालुक्यात मार्चपासून १२ महसूल मंडळ मंडळ स्तरावर शिबिरांचे आयोजन होत आहे. नागरिक, शेतकरी, विद्यार्थी, महिला यांच्या प्रश्नांचे निराकरण, तक्रारी निकाली काढणे, दाखले वितरण, फेरफार निकाली काढणे, गाव दफ्तर अद्ययावत करणे आदी विविध कामे शिबिराद्वारे पूर्ण होत आहेत. राजस्व अभियान शिबिरात विविध दाखले, सातबारा, फेरफार आदी दाखले वितरीत करण्यात आले, तसेच कृषी यांत्रिकीकरण योजनेच्या माध्यमातून लाभार्थ्यांना ट्रॅक्टरच्या चाव्या वितरीत करण्यात आल्या. महसूल विभागासह विविध कार्यालयांचा शिबिरात सहभाग होता.

# विकासकामांच्या खोदकामात वीजवाहिन्या तुटण्याच्या त्रासातून पनवेलकरांची सुटका

## नगरसेवक ॲड. प्रथमेश सोमण यांच्या पुढाकाराने 'टास्क फोर्स' होणार कार्यान्वित

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर):** पनवेल शहरातील टिळक रोड, महात्मा फुले रोड, एचओसी कॉलनीच्या मागील रोड, गडकरी मार्ग आणि महात्मा गांधी मार्ग या अत्यंत महत्त्वाच्या व वर्दळीच्या भागातील नागरिक गेल्या अनेक दिवसांपासून वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे हैराण झाले आहेत. विकासकामे आणि गॅस पाईपलाईनच्या खोदकामात भूमिगत वीजवाहिन्या तुटण्याचे प्रमाण वाढल्याने हा प्रश्न गंभीर बनला होता. यावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी शिवसेनेचे नगरसेवक तथा पनवेल महानगरप्रमुख ॲड. प्रथमेश चंद्रशेखर सोमण यांनी प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करून एका विशेष समन्वय बैठकीची मागणी केली होती. या



मागणीची दखल घेत आयुक्त श्री. मंगेश चितळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत आता 'टास्क फोर्स' स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

शहरात सध्या काँक्रिटीकरणाचे आणि महानगर गॅसच्या जोडणीचे काम जोमाने सुरू आहे. मात्र, महापालिका आणि महावितरण यांच्यात समन्वयाचा अभाव असल्याने कंत्राटदारांकडून खोदकाम करताना वीजवाहिन्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत होते. विशेषतः जुन्या पनवेलमधील मुख्य रस्ते आणि वस्त्यांमध्ये हा त्रास अधिक जाणवत होता. नियमानुसार, रस्त्याच्या कामात आडव्या येणाऱ्या वाहिन्या कंत्राटदाराने स्वखर्चाने अंडरग्राउंड करणे आवश्यक असताना, प्रशासकीय ताळमेळ नसल्याने या कामात दिरंगाई होत होती. ही बाब ॲड. प्रथमेश सोमण यांनी पुराव्यांसह प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिली. सोमण यांच्या सूचनेनुसार व मागणीनुसार आयोजित या बैठकीत असा निर्णय झाला की, उद्यापासून कोणत्याही रस्त्याचे काम सुरू करण्यापूर्वी महापालिका, महावितरण आणि संबंधित कंत्राटदार यांची 'टास्क फोर्स' प्रत्यक्ष जागेवर जाऊन समन्वय साधेल. यामुळे खोदकामात वाहिन्या तुटण्याचे प्रकार थांबणार असून नागरिकांना विनाकारण अंधारात राहावे लागणार नाही.

या महत्त्वपूर्ण बैठकीला अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, शहर अभियंता संजय कटेकर, महावितरणचे अधीक्षक अभियंता श्री. माने, शहर अभियंता श्री. सातपुते व श्री. देशमुख उपस्थित होते. तसेच शिवसेनेच्या वतीने पनवेल समन्वयक राहुल गोगटे, उपमहानगर प्रमुख महेश सावंत, शहरप्रमुख प्रसाद सोनावणे, शहर संघटक अभिजीत साखरे, उपशहरप्रमुख अर्जुन परदेशी, तळोजा विभाग प्रमुख प्रकाश म्हात्रे, तालुका उपसंघटक नरेश नरसिंगे, मायनॉरिटी सेलचे अराफत पटेल आणि मिलिंद निंबाळकर यांनी बैठकीत सहभाग घेतला. प्रथमेश सोमण यांच्या या सक्रिय पुढाकारामुळे शहरातील प्रलंबित वीज समस्या सुटण्यास मोठी मदत होणार आहे.

# शिक्षणाची गंभीरता आर्ट्स ऑफ लाइफ कोचिंग लाखनी ने सिद्ध केले

**दैनिक युवक आधार**

**भावेश धंधुकीया भंडारा जिल्हा प्रतिनिधी** : नवीन शैक्षणिक धोरणाला अतिशय गंभीरपणे घेऊन, आर्ट्स ऑफ लाइफ कोचिंग चे संचालक श्री निहाल वालदे सर यांनी यावर्षीच्या भविष्य समर ट्रेनिंग 2.0 मध्ये एक नवीन ट्रेनिंग चे समावेश केले आहे. ती ट्रेनिंग म्हणजे जापनीज स्पिकिंग ट्रेनिंग. आता आर्ट्स ऑफ लाईफ कोचिंग फक्त मराठी, हिंदी आणि इंग्लिश बोलण्यापुरताच नाही तर विद्यार्थ्यांना जापनीज बोलायला सुद्धा शिकवणार आहे. आर्ट्स ऑफ लाइफ कोचिंग च्या भविष्य समर ट्रेनिंग उपक्रमाने विद्यार्थ्यांच्या जीवनामध्ये नक्कीच एक नवीन बदल घडून येणार आहे. जापनीज भाषा शिकवणाऱ्या प्रशिक्षिका प्राची मॅम यांनी आर्टस ऑफ लाईफच्या या उद्देशाला साथ दिली त्याबद्दल आर्टस ऑफ लाइफ कोचिंग चे संचालक श्री निहाल वालदे सर यांनी प्राची मॅम चे आभार मानले. सोबतच विद्यार्थी जीवनाला एक वेगळे वळण देऊन प्रत्येक विद्यार्थ्याला घडवण्याचा ध्यास निरंतर




राहील असे आश्वासन निहाल सरांनी दिले. श्री निहाल वालदे सर यांच्या या उपक्रमाला आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा.

# प्राणीमित्र चैताली भस्मे का साई नगरी शिर्डी मे भव्य सत्कार

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे नागपूर -** ओम साई विकास प्रतिष्ठान एवं बी बी सी फिल्म प्रोडक्शन महाराष्ट्र राज्य के संयुक्त तत्वावधान में परिवार लॉन्स एवं बैंकेट हॉल, साईनगरी शिर्डी में भव्य सम्मान समारोह का आयोजन किया गया। इस समारोह में समाज के विभिन्न क्षेत्रों में उल्लेखनीय कार्य करने वाले विशिष्ट व्यक्तियों का सम्मान किया गया।मनीष नगर, नागपुर निवासी विषैले साँपों से सैकड़ों लोगों की जान बचाने वाली तथा मूक प्राणियों को जीवनदान देने वाली महिला सर्पमित्र, प्राणीमित्र, वन्यजीव रक्षक एवं मांगल्य फाउंडेशन की संस्थापिका चैताली भस्मे को समाज में उनके उल्लेखनीय कार्यों के लिए "महाराष्ट्र साई पद्मश्री पुरस्कार 2026" से सम्मानित किया गया।

वर्ष 2005 से लेकर आज तक निरंतर निस्वार्थ समाजसेवा, प्राणीसेवा एवं प्रकृति सेवा के लिए चैताली भस्मे का सम्मान किया गया।

इस अवसर पर कार्यक्रम के मुख्य आयोजक सुदाम संसारे, प्रमुख अतिथि किशोर कालडा, एडवोकेट सतीश चंद्र सुद्रिक, एडवोकेट दिलीप शेषराव वाघ, श्रीमती सुमन देसाई, श्रीमती वैशाली सोनवणे आदि उपस्थित थे।

# यामी गौतम धर यांचा 'द अँबर प्रॉमिस फॉर विमेन्स हेल्थ' उपक्रमात सहभाग

**दैनिक युवक आधार**

**मुंबई, वार्ताहर :** महिला आणि मुलांच्या आरोग्य सेवांमधील उत्कृष्टतेचे प्रतीक असलेल्या सूर्या हॉस्पिटल्सने आज 'अँबर विंग' या केवळ महिलांसाठी समर्पित आरोग्य सुविधेचे उद्घाटन केले. ही सुविधा महिलांसाठी विशेष, प्रतिबंधात्मक आणि प्रगत आरोग्य सेवा सादर करण्यासाठी तयार करण्यात आली आहे. या उद्घाटन सोहळ्याला अभिनेत्री आणि आरोग्य जागृती समर्थक श्रीमती यामी गौतम धर यांच्यासह ज्येष्ठ डॉक्टर, आरोग्य क्षेत्रातील तज्ज्ञ आणि सूर्या हॉस्पिटल्सचे नेतृत्व संघ उपस्थित होते.




डॉ.भूपेंद्र एस.अवस्थी, संस्थापक, अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक, सूर्या हॉस्पिटल्स म्हणाले,"महिलांच्या आरोग्यासाठी केवळ प्रतिबंधात्मक आणि निदानात्मक गरजाच नव्हे, तर विशेष शस्त्रक्रियेच्या हस्तक्षेपांची पूर्तता करू शकेल अशा समर्पित पायाभूत सुविधांची आवश्यकता आहे. अँबर विंगची निर्मिती महिलांसाठी एक प्रगत शस्त्रक्रिया केंद्र म्हणून करण्यात आली आहे, ज्यामुळे आमच्या सध्याच्या युनिटच्या क्षमतेत मोठी भर पडेल आणि विशेष शस्त्रक्रिया, क्रिटिकल केअर आणि एकत्रित उपचार पद्धती एकाच छताखाली उपलब्ध होतील. जागतिक दर्जाच्या आरोग्य परिसंस्थेच्या माध्यमातून महिलांना वेळेवर निदान, प्रगत शस्त्रक्रिया नैपुण्य आणि संवेदनशील काळजी प्रदान करणे, हे आमचे ध्येय आहे."

भारतातील एकत्रित आणि विशेष महिला आरोग्य पायाभूत सुविधांची वाढती गरज पूर्ण करण्यासाठी अँबर विंगची संकल्पना मांडण्यात आली यामध्ये अतिरिक्त ५५ बेड्समुळे सांताक्रूझ येथील समर्पित महिला व बाल-केंद्रित आरोग्य पायाभूत सुविधेची एकूण क्षमता २५० पेक्षा जास्त खाटांवर पोहोचली आहे, विशेष सल्लागार कक्ष, प्रगत निदान आणि स्क्रीनिंग सहाय्य, कार्डिओलॉजी आणि कार्डियाक सर्जरी, अँब्युलेटरी आणि रोबोटिक जॉइंट रिप्लेसमेंट शस्त्रक्रियेसाठी उत्कृष्ट केंद्र, प्लास्टिक आणि कॉस्मेटिक शस्त्रक्रिया, किमान आक्रमक गॅस्ट्रोइंटेस्टाइनल शस्त्रक्रिया, अत्याधुनिक क्रिटिकल केअर सुविधा, रोबोटिक सर्जरीसाठी उत्कृष्ट केंद्र (लवकरच येत आहे), महिलांसाठी प्रतिबंधात्मक आरोग्य तपासणी कार्यक्रम.

यामी गौतम धर, अभिनेत्री म्हणाल्या,"अनेक महिला स्वतःच्या आरोग्यापेक्षा कुटुंबाच्या कल्याणाला प्राधान्य देतात, त्यामुळे त्यांचे आरोग्य अनेकदा दुर्लक्षित राहते. अँबर विंगसारखे समर्पित आरोग्य उपक्रम वेळेवर डॉक्टरांचा सल्ला घेणे, नियमित तपासणी (screenings), प्रतिबंधात्मक काळजीबद्दल जागरूकता निर्माण करणे आणि गरज पडल्यास विशेष शस्त्रक्रिया उपचार उपलब्ध करून देणे यासाठी महत्त्वाचे आहेत. महिलांचे आरोग्य आणि आजारांचे लवकर निदान यावर विशेष लक्ष केंद्रित करणाऱ्या या उपक्रमाला पाठिंबा देताना मला मनापासून आनंद होत आहे."

डॉ.भुवन डी, झोनल डायरेक्टर, सूर्या हॉस्पिटल्स म्हणाले,"नवीन अँबर विंग हा संपूर्ण मुंबईतील रुग्णांसाठी प्रगत शस्त्रक्रिया निगा प्रबळ करण्याच्या दिशेने टाकलेले एक महत्त्वाचे पाऊल आहे. ही सुविधा आम्हाला आधुनिक पायाभूत सुविधा आणि बहुशाखीय तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली कार्डियाक सायन्सेस, कार्डियाक सर्जरी, ऑर्थोपेडिक्स आणि रोबोटिक जॉइंट रिप्लेसमेंट सर्जरी यांसारख्या प्रमुख विभागांची ओळख करून देण्यास आणि त्यांचा विस्तार करण्यास सक्षम करेल. या विस्तारामुळे, प्रगत क्लिनिकल सेवांची उपलब्धता सुधारणे आणि तंत्रज्ञान, नैपुण्य व समन्वयित वैद्यकीय सहाय्याद्वारे दर्जेदार आरोग्य सेवा देणे हे आमचे उद्दिष्ट आहे."

या लाँचचा एक भाग म्हणून, सूर्या हॉस्पिटल्सने 'द अँबर प्रॉमिस फॉर विमेन्स हेल्थ' हा एक प्रतीकात्मक जागरूकता उपक्रम देखील सुरू केला आहे. महिलांना प्रतिबंधात्मक आरोग्य सेवा, नियमित तपासणी आणि वेळेवर वैद्यकीय मदतीला प्राधान्य देण्यासाठी प्रोत्साहित करणे हे याचे उद्दिष्ट आहे. या उपक्रमात पाहुणे, डॉक्टर, आरोग्य तज्ज्ञ आणि उपस्थितांना महिलांचे आरोग्य आणि प्रतिबंधात्मक काळजीबद्दल त्यांचे संदेश आणि वचनबद्धता सामायिक करण्यासाठी आमंत्रित करण्यात आले, ज्यामुळे महिलांमध्ये अधिक जागरूकता आणि पुढाकार घेण्याच्या वृत्तीची गरज अधोरेखित झाली.

# चिखली येथे झोन स्तरीय संत निरंकारी महिला समागमाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**रंगनाथ सावळे पाटील** : संत निरंकारी मिशनतर्फे झोन क्रमांक ३६, छत्रपती संभाजीनगर व बुलढाणा अंतर्गत झोन स्तरीय संत निरंकारी महिला समागमाचे आयोजन चिखली येथे करण्यात आले आहे. सद्गुरू माता सुदीक्षा जी महाराज यांच्या कृपेने हा समागम पार पडणार असून महिलांसाठी विशेष सत्संग व प्रवचनाचा कार्यक्रम होणार आहे. हा समागम रविवार , दि.

17 मे 2026 रोजी सकाळी 11 ते दुपारी 02 वाजेपर्यंत परमहंस रामकृष्ण मौनीबाबा मठ छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्या जवळ चिखली जि.बुलडाणा येथे आयोजित करण्यात आला आहे.



कार्यक्रमात प्रमुख उपस्थिती म्हणून प.पू. मनीषा ताई चंचलाणी (मुंबई) यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. आयोजकांच्या वतीने सर्व महिला भगिनींनी या सत्संग व प्रवचनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. समागमानंतर लंगर प्रसादाचे आयोजन करण्यात आले असून, तसेच या भक्तांना ब्रह्मज्ञान (देवाची ओळख) प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे. कार्यक्रमासाठी विविध पदाधिकारी व कार्यकर्ते यांचे सहकार्य लाभत असून, कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी व्यापक तयारी करण्यात आली आहे.

# टेम्पल गार्डनला द्या धर्मवीर संभाजी महाराजांचे नाव; अजय मोतीवार यांची मागणी

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : वाशिम अकोला नाका येथील नगर परिषद समोरील टेम्पल गार्डनचे नामकरण धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराज यांच्या नावाने करण्यात यावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते अजय मोतीवार यांनी वाशिम नगर परिषदेचे मुख्याधिकारी यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

अजय मोतीवार यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, वाशिमकर नागरिक अनेक वर्षांपासून शहरात सुसज्ज सार्वजनिक उद्यानाच्या प्रतीक्षेत आहेत. अकोला नाका परिसरातील नगर परिषदेसमोरील जागेवर उभारण्यात येणाऱ्या टेम्पल गार्डनच्या कामाला अनेक अडचणींनंतर अखेर गती मिळाली असून काही दिवसांपूर्वी पालकमंत्र्यांच्या हस्ते या उद्यानाच्या कामाला हिरवी झेंडी देण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.



जिल्ह्यातील अनेक शासकीय व निमशासकीय वास्तूंना विविध महापुरुषांची नावे देऊन त्यांच्या कार्याला अभिवादन करण्यात आले आहे. त्याच धर्तीवर स्वराज्याच्या रक्षणासाठी अद्वितीय शौर्य, त्याग आणि बलिदान देणारे धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराज यांचे नाव या उद्यानाला देण्यात यावे, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. धर्म आणि स्वराज्यासाठी प्राणार्पण करणाऱ्या संभाजी महाराजांच्या स्मृतीला ही खरी आदरांजली ठरेल, असेही मोतीवार यांनी नमूद केले आहे.

वाशिम शहराच्या सांस्कृतिक व ऐतिहासिक ओळखीला साजेसे असे हे उद्यान केवळ नागरिकांच्या विरंगुळ्याचे ठिकाण न राहता पुढील पिढ्यांना प्रेरणा देणारे स्मरणस्थळ ठरावे, अशी भावना या मागणीमागे व्यक्त करण्यात आली आहे. सार्वजनिक ठिकाणाला राष्ट्रपुरुषाचे नाव दिल्यास त्या ठिकाणाचे महत्त्व अधिक वाढते आणि युवकांमध्ये इतिहासाबद्दल अभिमान निर्माण होतो, असेही निवेदनात म्हटले आहे.

या निवेदनाची प्रत जिल्हाधिकारी यांनाही पाठविण्यात आली आहे. या मागणीवर अजय मोतीवार यांच्यासह भूषण देशपांडे, गिरीष खंडेलवाल, प्रतिक कांबळे आणि संध्याताई सभादिंडे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. नगर परिषद प्रशासनाने या मागणीचा सकारात्मक विचार करून टेम्पल गार्डनला धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराज यांचे नाव द्यावे, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

# साई मंदिरचे शिस्तबद्ध व्यवस्थापन : महेंद्रशेठ घरत

## निष्ठा पाटील हिचा साई मंदिर वहाळतर्फे सत्कार

**दैनिक युवक आधार**

**उलवे, वार्ताहर :** निष्ठा प्रज्वल पाटील हिने दहावीत घवघवीत यश मिळविल्याने वहाळच्या साई मंदिरात तिचा गुरुवारी (ता. १४) महेंद्रशेठ घरत यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी मो. का. मढवी गुरुजी, साई मंदिरचे संस्थापक-अध्यक्ष रविशेठ पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. इंटकचे उपाध्यक्ष जयवंत पाटील यांची ती नात होय.

यावेळी आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्रशेठ घरत म्हणाले, "वहाळच्या साई मंदिरचे व्यवस्थापन अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने काम करीत आहे. त्यामुळे मी प्रभावित होऊन साई मंदिरात दरमहा अन्नदान करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे महिन्याच्या दुसऱ्या गुरुवारी आम्ही अन्नदान करतो, ते कायम सुरूच राहील. गेली अनेक वर्षे अव्याहतपणे हे काम रविशेठ पाटील यांच्या मार्गदर्शनाने सुरू आहे, हे कौतुकास्पद आहे. मी सुद्धा काबाडकष्ट करून वर आलोय, आई-वडिलांच्या मेहनतीमुळे, संस्कारामुळे आणि




समाजाला देण्याच्या भूमिकेमुळे आजची माझी वाटचाल सुखकर आहे. आजघडीला मी जग पालथे घातले आहे, कैलास मानसरोवरापासून सर्व देवस्थाने पाहिली, पण मला देव मानसात दिसतोय."

यावेळी श्री जय हनुमान प्रासादिक भजन मंडळ वाकडी यांचे सुश्राव्य भजन झाले. जयवंत गंगाराम पाटील आणि जयश्री जयवंत पाटील यांना साई मंदिरात मंगलस्नान करण्याचा मान मिळाला. यावेळी त्यांचे सर्व कुटुंबीय उपस्थित होते. यावेळी महेंद्रशेठ घरत आणि शुभांगीताई घरत यांच्यातर्फे अन्नदान करण्यात आले.

# हिंदी-मराठी पत्रकार संघाच्या महाराष्ट्र राज्य अध्यक्ष धनश्रीताई पाटील यांची साखरतुला

## वाढदिवसानिमित्त पत्रकारांकडून अनोखी शुभेच्छा

**दैनिक युवक आधार**

**संपादक संतोष आमले** : हिंदी-मराठी पत्रकार संघाच्या महाराष्ट्र राज्य अध्यक्षा धनश्रीताई काटिकर पाटील यांचा वाढदिवस नुकताच मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने पत्रकार संघाच्या वतीने त्यांची साखरेने तुला (साखरतुला) करून त्यांना अनोख्या शुभेच्छा देण्यात आल्या. सामाजिक आणि पत्रकारिता क्षेत्रात त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याचा गौरव म्हणून हा सोहळा आयोजित करण्यात आला होता.

धनश्रीताई काटीकर पाटील यांनी नेहमीच पत्रकारांच्या प्रश्नांसाठी आणि समाजातील उपेक्षित घटकांसाठी लढा दिला आहे. त्यांच्या या कार्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी पत्रकार संघाच्या पदाधिकारी व सदस्यांनी एकत्र येत हा साखरतुलेचा कार्यक्रम आखला. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते धनश्रीताईंचे औक्षण करण्यात आले.यावेळी धनश्रीताईंनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, "पत्रकार संघाने दिलेले हे प्रेम आणि विश्वास माझी जबाबदारी अधिक वाढवणारा आहे. आगामी काळातही पत्रकारांच्या हितासाठी माझे कार्य अविरत सुरू राहील."




**कार्यकर्त्यांचे अथक परिश्रम**

**हा सोहळा यशस्वी करण्यासाठी हिंदी-मराठी पत्रकार संघाच्या सर्व सदस्यांनी आणि कार्यकर्त्यांनी गेल्या अनेक दिवसांपासून मोठी तयारी केली होती. कार्यक्रमाचे नियोजन, सजावट आणि पाहुण्यांचे स्वागत यासाठी कार्यकर्त्यांनी घेतलेले परिश्रम या सोहळ्याच्या यशस्वितेतून दिसून आले. 'ताई'प्रती असलेले प्रेम आणि आदर या निमित्ताने सर्व स्तरातून पाहायला मिळाला.**

या सोहळ्याला राजकीय, सामाजिक आणि पत्रकारिता क्षेत्रातील अनेक दिग्गज उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी तुला केलेली साखर गरिबांना आणि गरजू संस्थांना वाटप करण्याचा स्तुत्य निर्णयही यावेळी घेण्यात आला.

# आजच्या राजकारणात अर्थकारण : गणेश नाईक

## आगरी समाजाचा मला सार्थ अभिमान : महेंद्रशेठ घरत

**दैनिक युवक आधार**

**पेण,वार्ताहर :** "दुसऱ्याच्या आयुष्यातील सुख ओरबाडल्यास आपल्याला सुख लाभत नाही. त्यांना वातानुकूलित दालनातही घाम फुटतो. प्राणी असो वा माणूस आपल्या पोटच्या गोळ्याला कधीही कुणी पायदळी तुडवत नाही. एकेकाळी आगरी समाजाला खूप बदनाम केले गेले. मात्र तो काळ गेला, आज समाजाची प्रगती सर्वच बाबतीत निश्चितच चांगल्या प्रकारे होत आहे. स्वाभिमानाने आपला पुढे जात आहे. मी सामाजिक बांधिलकी जपून काम करीत आहे, मात्र आजच्या राजकारणात अर्थकारणाशिवाय काही नाही," असे वनमंत्री गणेश नाईक पेण येथे म्हणाले. पेण येथे शुक्रवारी (ता. १५) अखिल भारतीय आगरी सामाजिक संस्था आयोजित राष्ट्रीय आगरी आध्यात्मिक संमेलन पार पडले. त्याचे उदघाटन वनमंत्री गणेश नाईक, आमदार रवींद्र पाटील, आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्रशेठ घरत आदी मान्यवरांच्या उपस्थितीत झाले.

यावेळी आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत म्हणाले, "आगरी




समाजाची ताकद मोठी आहे, परंतु समाज विखुरला आहे. आज आगरी समाज एकसंध झाला तर रायगड, ठाणे येथील सर्व आमदार, खासदार आगरी समाजाचेच होतील. मी जिल्हा परिषद सदस्य होताच सर्वप्रथम जलकुंभ उभारून महिलांच्या डोक्यावरील हंडा उतरवला. आगरी समाजासाठी मी सर्व प्रकारचे सहकार्य करीत आलो आहे आणि करीतच राहीन. कारण आगरी असल्याचा मला सार्थ अभिमान आहे. मात्र दिबांचे नाव अद्यापही नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दिले जात नाही, ही शोकांतिका आहे. त्यामुळे समाज पेटून उठला पाहिजे. सत्ताधाऱ्यांना त्यांची जागा दाखवायला हवी. आज आगरी समाजातील असंख्य तरुण, तरुण उच्च शिक्षण घेत आहेत, हे अभिमानास्पद आहे. आपला आगरी समाज स्वाभिमानी आहे, छत्रपती शिवाजी महाराजांनीही आगरी समाजावर अतोनात प्रेम केले. शिवरायांच्या काळातही आगरी समाजाचे योगदान अनन्यसाधारण आहे, मात्र आताच्या राज्यकर्त्यांना दिबांच्या नावाचा विसर पडला आहे. त्यांना आगरी समाजाचे योगदान कळत नाही. त्यामुळे येत्या काळात आगरी समाजाची एकजूट कायम हवी. नाही तर रात्र वैऱ्याची आहे, हे समाजातील नेत्यांनीही लक्षात घ्यावे. आगरी समाजासाठी मी काम करतो. समाजासाठी सर्वकाही सहकार्य करतो आणि यापुढेही करायला तयार आहे. मी आंतरराष्ट्रीय पातळीवर कामगारांचे नेतृत्व करीत असलो तरी माझी सही मी मराठीत करतो. आगरी माणसाने आगरी समाजाला साथ दिली पाहिजे. तरच समाज कुठेतरी जिवंत राहील."

यावेळी पेणचे आमदार रवींद्र पाटील, पुरुषोत्तम महाराज यांनीही आपले विचार मांडले. प्रास्ताविक सूर्यकांत पाटील यांनी केले. यावेळी 'वारी देवाची' या स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले.

तबलावादक प्रताप पाटील, जगदीश पाटील, संजीवन म्हात्रे, तसेच समाजातील अनेक मान्यवर मंडळींचा यावेळी सत्कार करण्यात आला. आगरी समाजाचे कार्य म्हणून यावेळी दोन लाख रुपयांची देणगी महेंद्रशेठ घरत यांनी दिली. "समाजाचे उपकार कधीही विसरणार नाही, ज्यांच्या नावात इंद्र आहे, ते महेंद्रशेठ घरत असे सुप्रसिद्ध गायक जगदीश पाटील म्हणाले. यावेळी 'माझा आगरी आगरी जाम हाय स्वाभिमानी' हे गाणे त्यांनी गाऊन रसिकांना जिंकले.

# पालखी महामार्गावरून भवानीनगरमध्ये तणाव

## गडकरींची पाहणी, निर्णयासाठी तांत्रिक आढाव्याचे आश्वासन

**दैनिक युवक आधार**

**सणसर : विकास क्षत्रिय** : संत तुकाराम महाराज पालखी महामार्गाच्या अपुऱ्या कामाच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी शुक्रवारी (ता. १५ मे) इंदापूर तालुक्यात पाहणी केली. या पाहणीदरम्यान भवानीनगर येथे श्री छत्रपती कारखान्याचे अध्यक्ष पृथ्वीराज बापू जाचक यांनी विविध समस्या मांडत महामार्गाच्या आराखड्यात बदल करण्याची मागणी केली.

भवानीनगर येथे श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष पृथ्वीराज बापू जाचक यांनी महामार्ग कारखान्याच्या समोरून जात असल्याने तो मागील बाजूस



वळवावा,अशी ठाम मागणी केली.त्यांनी सांगितले की, या प्रकल्पामुळे बारामती इंदापूर तालुक्यातील सुमारे एक लाख लोकांच्या उदरनिर्वाहावर परिणाम होणार असून शेतकरी व व्यापाऱ्यांना याचा मोठा आर्थिक फटका बसत आहे.

सद्यस्थितीत महामार्गामुळे कारखाना दोन भागांत विभागला जाणार आहे. एका बाजूला कारखाना तर दुसऱ्या बाजूला ऊस साठवण व्यवस्था राहणार असल्याने उत्पादन प्रक्रियेवर परिणाम होण्याची भीती व्यक्त करण्यात आली.तसेच कारखान्याच्या पाठीमागील बाजूचे यांच्यासोबत चर्चा केली असून शेतकरी रस्त्यासाठी जागा देण्यास तयार असून शासनाने सकारात्मक भूमिका घ्यावी,अशी मागणी जाचक यांनी केली.

यावर प्रतिक्रिया देताना गडकरी यांनी तांत्रिक अडचणींचा सविस्तर आढावा घेऊन योग्य तो निर्णय घेतला जाईल,असे आश्वासन दिले.त्यानंतर त्यांनी पुढील दौरा सुरू ठेवला.दरम्यान,पत्रकारांशी बोलताना पृथ्वीराज बापू जाचक यांनी आक्रमक भूमिका घेतली. "कारखान्यासमोरून महामार्गाचे काम बळजबरीने सुरू ठेवले,तर कारखाना वाचवण्यासाठी मी स्वतः आत्मदहन करेन; पण हा रस्ता होऊ देणार नाही," असा इशाराही त्यांनी दिला.या वक्तव्यामुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# वादळी वाऱ्याने सोलर पॅनल उखडून पडला ; शेतकऱ्यांचे नुकसान


**दैनिक युवक आधार**

**बीड आष्टी प्रतिनिधी मारुती सत्रे** : तालुक्यातील कऱ्हेवडगांव ,कऱ्हेवाडी , पांगुळगव्हाण परिसरासह दि.१३मे रोजी दुपारी वादळी वाऱ्यासह विजेच्या कडकडाटात अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली. उन्हाळी पिकांसह .आंबा ,लिंबुनी, संत्रा फळबागा उन्मळून पडल्या. जनावरांचे गोठे,पत्रे उडून गेले,काढणीला आलेले कांदे भिजले आहेत. विद्युत सयंत्र, विद्युत तारा व विजेचे खांब पडल्याने विद्युत पुरवठा खंडित



झाला आहे. या वादळीवाऱ्याने

कऱ्हेवडगाव येथील शेतकरी सुभाष नारायण नागरगोजे यांच्या शेतातील शक्ती कंपनीचे सोलर पॅनेल उपटून पडल्याने पॅनलचे नुकसान झाले आहे. या नुकसानीमुळे शेतकऱ्यांवर दुहेरी संकट ओढवले आहे. एकीकडे उन्हाळ्याच्या तोंडावर पाण्याची गरज वाढत असताना सौर पंप बंद पडल्याने सिंचनावर परिणाम होत आहे. संबंधित कंपनीने नविन पॅनल तातडीने बसवून देण्याची मागणी शेतकऱ्याने केली आहे.






















# वेळीच निदान झाल्याने मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये दुर्मीळ ब्रेन स्ट्रोकवर यशस्वी उपचार

## ५४ वर्षीय महिलेचा गंभीर अपंगत्वाचा धोका टळला

**दैनिक युवक आधार**
**नवी मुंबई वार्ताहर :** मेडिकव्हर हॉस्पिटलमधील डॉ. पवन ओझा(रिजनल डायरेक्टर ऑफ न्युरोसायन्सेस) आणि डॉ. सुरंजन बसाक(न्युरोलॉजिस्ट)* यांच्या टीमने ५४ वर्षीय महिलेमध्ये आढळलेल्या दुर्मीळ आणि गंभीर सेंट्रल नर्वस सिस्टम व्हॅस्क्युलायटिस अशा आरोग्य स्थितीवर उपचार करत तिला नवे आयुष्य मिळवून दिले. सेंट्रल नर्वस सिस्टम व्हॅस्क्युलायटिस एक दुर्मिळ स्थिती आहे जिथे मेंदू आणि पाठीच्या कण्यातील रक्तवाहिन्या सूजतात. ही जळजळ मेंदूतील रक्तप्रवाहात व्यत्यय आणू शकते, ज्यामुळे विविध न्यूरोलॉजिकल समस्या उद्भवतात.



रुग्णाला अचानक अशक्तपणा आणि बोबडी वळणे अशी लक्षणे जाणवत होती. सुरुवातीला हा प्रकार उच्च रक्तदाबामुळे झालेला नेहमीचा ब्रेन हॅमरेज वाटत होता; मात्र ४८ तासांनंतर तिची प्रकृती अचानक खालावल्याने डॉक्टरांना संशय आला. त्यानंतर करण्यात आलेल्या प्रगत तपासण्या, निरीक्षण आणि तातडीच्या उपचारांमुळे मेंदूचे होणारे नुकसान थांबवण्यात यश आले.

*नवी मुंबईतील गृहिणी श्रीमती चैताली हलदर* यांना गेल्या १० वर्षांपासून उच्च रक्तदाब आणि मधुमेहाचा त्रास होता. हॉस्पिटलमध्ये दाखल होण्याच्या सुमारे एक तास आधी त्यांना अचानक शरीराच्या डाव्या बाजूला अशक्तपणा जाणवू लागला. त्यांचे बोलणे अस्पष्ट झाले होते तसेच आधाराशिवाय बसणे किंवा उभे राहणे शक्य होत नव्हते. मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये दाखल झाल्यावर त्यांचा रक्तदाब धोकादायक पातळीवर म्हणजे २२०/११० मिमी एचजी इतका वाढला होता. न्युरोलॉजिकल तपासणीत डाव्या बाजूस अशक्तपणा , सुन्नपणा, समन्वय साधण्यात अडचणी, चेहऱ्याचा एक भाग लूळा पडणे आणि अस्पष्ट उच्चार अशी लक्षणे दिसून आली. मेंदूच्या सीटी स्कॅनमध्ये उजव्या भागात रक्तस्राव आणि सूज दिसून आली. तसेच मेंदूच्या दुसऱ्या भागात एक लक्षणं न दिसलेला छोटा स्ट्रोक आढळून आला. सीटी अँजिओग्राफीमध्ये रक्तवाहिन्यांमध्ये कोणतीही असामान्यता दिसून आली नाही.

रुग्णाला तातडीने अतिदक्षता विभागात दाखल करून रक्तदाब नियंत्रण, मेंदूतील सूज कमी करण्यासाठी औषधोपचार आणि झटके टाळण्यासाठी उपचार सुरू करण्यात आले. सुरुवातीच्या २४ तासांत प्रकृती स्थिरावल्याचे दिसून आले आणि कमीत कमी रक्तस्राव झाला होता. त्यामुळे डॉक्टर आणि कुटुंबीयांना काहीसा दिलासा मिळाला. मात्र सुमारे ५६ तासांनंतर अचानक डाव्या हातामध्ये अशक्तपणा दिसून आला आणि रुग्णाचे भान हरपले ,ती बोलण्यास प्रतिसाद देत नव्हती. त्यामुळे पुन्हा रक्तस्राव झाला असावा अशी भीती डॉक्टरांना वाटली. पुन्हा करण्यात आलेल्या मेंदूच्या तपासणीत रक्तस्राव वाढलेला नसतानाही मेंदूमध्ये नव्या इन्फार्क्शनची चिन्हे दिसून आली. तसेच अनेक सूक्ष्म रक्तस्रावही आढळले. हा प्रकार सामान्य उच्च रक्तदाबामुळे होणाऱ्या ब्रेन हॅमरेजसारखा नसल्याचे लक्षात येताच डॉक्टरांनी व्हॅस्क्युलायटिस तपासण्या आणि डीएसए (ब्रेन अँजिओग्राफी) यांसह पुढील तपासण्या सुरू केल्या.

डॉ. पवन ओझा (रिजनल डायरेक्टर ऑफ न्युरोसायन्सेस, मेडिकव्हर हॉस्पिटल, खारघर, नवी मुंबई)म्हणाले,* सुरुवातीला हा उच्च रक्तदाबामुळे झालेला नेहमीचा मेंदूतील रक्तस्राव वाटत होता. मात्र रक्तस्रावाचे ठिकाण आणि अचानक प्रकृती खालावणे हे सामान्य नव्हते. त्यामुळे आम्ही अधिक सखोल तपासणी केली. एमआरआयमध्ये अनेक सूक्ष्म इन्फार्क्ट्स आणि विखुरलेले मायक्रोब्लीड्स दिसून आले. रक्तस्राव आणि इन्फार्क्ट्स एकत्र दिसणे हे मेंदूतील लहान रक्तवाहिन्यांवर परिणाम करणाऱ्या लहान सेंट्रल नर्वस सिस्टम व्हॅस्क्युलायटिस या दाहजन्य आजाराचा संकेत होता. सीएनएस व्हॅस्क्युलायटिस हा दुर्मीळ न्युरोलॉजिकल आजार असून त्यात मेंदूमध्ये असामान्य रक्तस्राव किंवा स्ट्रोक, क्रॅनियल न्युरोपॅथी आणि मेंदुला झटके येणे अशी लक्षणे दिसून येतात. दर दहा लाख लोकसंख्येमागे सुमारे २.४ रुग्णांमध्ये हा आजार आढळतो. योग्य वेळी निदान झाल्यास हा आजार उपचारक्षम आहे. महत्त्वाचे म्हणजे नियमित अँजिओग्राफी तपासण्यांमध्ये हा आजार अनेकदा दिसून येत नाही, कारण प्रभावित रक्तवाहिन्या अतिशय सूक्ष्म असतात. पुढील तपासण्यांमध्ये दाह वाढल्याची चिन्हे आणि ऑटोइम्यून स्थिती आढळल्याने निदान निश्चित झाले. त्यानंतर आम्ही तातडीने उच्च मात्रेतील इंट्राव्हेनस स्टेरॉइड्स आणि इम्युनोसप्रेसिव्ह थेरपी सुरू केली.

डॉ. सुरंजन बसाक (न्युरोलॉजिस्ट, मेडिकव्हर हॉस्पिटल, खारघर, नवी मुंबई) म्हणाल्या,* हे अत्यंत आव्हानात्मक प्रकरण होते कारण सीटी अँजिओग्राफी आणि डिजिटल सब्ट्रॅक्शन अँजिओग्राफी (DSA) या नियमित तपासण्या सामान्य होत्या. स्मॉल व्हेसल व्हॅस्क्युलायटिसमध्ये प्रभावित रक्तवाहिन्या इतक्या सूक्ष्म असतात की त्या या तपासण्यांमध्ये दिसत नाहीत. रुग्णाची अचानक बिघडलेली प्रकृती ही मोठी धोक्याची घंटा होती. अशा वेळी आजाराची पूर्ण खात्री होईपर्यंत वाट पाहिल्यास उपचारास विलंब होऊ शकतो. त्यामुळे रोगाची प्रगती थांबवण्यासाठी आणि रुग्णाला लवर बरे वाटावे यासाठी वेळेवर इम्युनोसप्रेसिव्ह थेरपी सुरू करणे गरजेचे आहे.

डॉ. पवन ओझा पुढे म्हणाले, इंट्राव्हेनस स्टेरॉइड्स आणि इम्युनोसप्रेसंट उपचारानंतर रुग्णाची प्रकृती वेगाने स्थिर झाली आणि त्यात सुधारणा दिसून आली. सध्या त्या देखभाल उपचारांवर आहेत आणि नियमित फॉलोअप घेत आहेत. त्यांच्या प्रकृतीत सातत्याने सुधारणा होत आहे. हे प्रकरण एक महत्त्वाचा संदेश देतो की मेंदूतील रक्तस्राव असामान्य असेल तर त्यामागील मूळ कारणाचा शोध घेणे आवश्यक असते. रक्तस्रावाचे असामान्य ठिकाण, रक्तस्रावासोबत स्ट्रोकची चिन्हे आणि अचानक प्रकृती खालावणे ही सेंट्रल नर्वस सिस्टम व्हॅस्क्युलायटिस आजाराची लक्षणे असू शकतात. योग्य वेळी उपचार न मिळाल्यास रुग्णाला कायमस्वरूपी लकवा येऊन दैनंदिन कामांसाठी इतरांवर अवलंबून राहावे लागले असते. मात्र योग्य निदान आणि वेळीच उपचारांमुळे रुग्णाला वाचवण्यात डॉक्टरांना यश आले. १० दिवसांत रुग्णाला घरी देण्यात आले आणि आठवड्याभरात रुग्णाच्या प्रकृतीत सुधारणा झाली. आता त्या कोणत्याही आधाराशिवाय चालू शकतात आणि स्वतःची सर्व कामे स्वतंत्रपणे करू शकतात. दुर्मीळ प्रकारच्या स्ट्रोकचे वेळीच निदान आणि उपचार घेतल्यास गंभीर अपंगत्व टाळता येते आणि रुग्णाच्या पुनर्वसनाची शक्यता वाढते.

मेडिकव्हर हॉस्पिटल, नवी मुंबईचे सेंटर हेड संदीप जोशी म्हणाले, हे प्रकरण मेडिकव्हर हॉस्पिटलमधील तज्ज्ञांचा समन्वय, योग्य वेळी घेतलेले अचुक निर्णय आणि प्रगत निदान सुविधांचे महत्त्व अधोरेखित करतो. दुर्मीळ पण उपचारक्षम न्युरोलॉजिकल आजारांचे वेळेवर निदान आणि उपचार रुग्णाच्या आयुष्यात मोठा बदल घडवू शकतात.

# मनसेच्या मागणीला मोठे यश! खारपाडा टोलप्रश्नी NHAI झुकले

## १० दिवसांत सुविधा पूर्ण करण्याचे आश्वासन

**दैनिक युवक आधार**
**दिपक कोळवणकर पनवेल प्रतिनिधी :** खारपाडा टोलविरोधातील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या आक्रमक भूमिकेला अखेर मोठे यश मिळाल्याचे चित्र समोर आले आहे. मनसेच्या आंदोलनाच्या इशाऱ्यानंतर भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (NHAI) प्रशासनाला चर्चेसाठी पुढे यावे लागले असून, मनसेच्या विविध मागण्यांवर सकारात्मक भूमिका घेण्यात आली आहे.



काल मनसेच्या वतीने खारपाडा टोलविरोधात आंदोलनासाठी कार्यकर्ते प्रस्थान करत असताना पळस्पे फाटा येथे पोलिसांनी त्यांना अडवले.

यावेळी पोलिस प्रशासनाने आंदोलन न करण्याचे आवाहन करत NHAI अधिकाऱ्यांना घटनास्थळी चर्चेसाठी बोलावले.

त्यानुसार NHAI चे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले आणि मनसे पदाधिकारी व कार्यकर्त्यांसोबत सकारात्मक चर्चा पार पडली. या चर्चेदरम्यान रायगड जिल्हाध्यक्ष श्री. संदेश ठाकूर, रायगड जिल्हा रस्ते आस्थापना श्री. किरण गुरव, रायगड जिल्हाध्यक्ष वाहतूक सेना श्री. सचिन जाधव तसेच तालुकाध्यक्ष श्री. सुजित सोनवणे यांनी स्थानिक नागरिकांच्या समस्या आणि मनसेच्या मागण्या ठामपणे मांडल्या.

मनसेने टोल परिसरातील अपूर्ण सुविधा, स्थानिकांना दिलासा, नागरिकांशी योग्य वागणूक तसेच विविध मूलभूत प्रश्नांवर प्रशासनाला जाब विचारला.

यानंतर NHAI अधिकाऱ्यांनी पुढील १० दिवसांत अपूर्ण सुविधा पूर्ण करण्यात येतील, असे आश्वासन दिले.

मनसेने स्पष्ट इशारा देत सांगितले की, “जर दिलेल्या मुदतीत कामे पूर्ण झाली नाहीत, तर मनसे पुन्हा तीव्र आंदोलन छेडेल.”

दरम्यान, मनसेच्या आक्रमक भूमिकेमुळे प्रशासनाला चर्चेच्या टेबलावर यावे लागल्याने स्थानिक नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण असून, खारपाडा टोलप्रश्री मनसेला मोठे यश मिळाल्याची चर्चा परिसरात रंगली आहे.

# मालेगांव येथे जियो नेटवर्क गायब; अनेक दिवसांपासून ग्राहक वैतागले

**दैनिक युवक आधार**
**अर्धापूर प्रतिनिधी अरविंद पांचाळ :** अर्धापूर तालुक्यातील मालेगांव येथे जियो मोबाईल नेटवर्क सेवा वारंवार खंडित होत असल्याने ग्राहकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. गावात उभारण्यात आलेले जियोचे मोबाईल टॉवर केवळ नावालाच असल्याची भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

मालेगांव हे परिसरातील प्रमुख बाजारपेठेचे केंद्र असून येथे जियो नेटवर्क वापरणाऱ्या ग्राहकांची संख्या मोठी आहे. मात्र गेल्या अनेक दिवसांपासून नेटवर्क सतत गायब होत असल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा साम ना करावा लागत आहे. नेटवर्क बंद झाल्यानंतर तासन्तास सेवा पूर्ववत होत नसल्याने अनेकांचे संपर्क तुटत आहेत.



या समस्येमुळे ऑनलाइन व्यवहार, शासकीय कामे, बँकिंग सेवा, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक काम तसेच व्यापारी व्यवहारांवर मोठा परिणाम होत आहे. अनेक ग्राहकांनी जियो कंपनीकडे वारंवार तक्रारी करूनही परिस्थितीत कोणतीही सुधारणा होत नसल्याची खंत नागरिकांनी व्यक्त केली.

“जियोची सेवा म्हणजे सुविधा नसून नागरिकांसाठी अडचण आणि खोळंबा ठरत आहे,” अशी संतप्त प्रतिक्रिया ग्राहकांकडून उमटत आहे. संबंधित कंपनीने तातडीने दखल घेऊन मालेगांव येथील नेटवर्क सेवा सुरळीत करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

# खरीप हंगाम २०२६ : महाडीबीटी शेतकरी योजनेसाठी अर्ज प्रक्रिया सुरू

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी जयदीप लोखंडे** : राज्य सरकारतर्फे खरीप हंगाम २०२६ साठी महाडीबीटी – शेतकरी योजना जाहीर करण्यात आली असून शेतकऱ्यांना प्रमाणित बियाण्यांवर १००% अनुदान घटक उपलब्ध करून देण्यात येणार आहे. योजनेअंतर्गत सोयाबीन, तूर, मूग, उडीद, मका, बाजरी आणि भात या पिकांच्या बियाण्यांचा समावेश करण्यात आला आहे.

अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत २४ मे २०२६ अशी निश्चित करण्यात आली असून बियाण्यांचे सोडत मे शेवटच्या आठवड्यात घेण्यात येणार आहे. या सोडतीत प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्वावर निवड केली जाईल.

कृषी विभागानुसार,सोडत प्रक्रियेनंतर निवड झालेल्या शेतकऱ्यांना त्यांच्या नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर संदेश पाठवण्यात येईल.निवड झालेल्या लाभार्थ्यांनाच बियाण्यांचे वितरण केले जाणार आहे.कृषी विभागाने शेतकऱ्यांना वेळेत अर्ज करून या अनुदान योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

# माजी राज्यमंत्री दर्जा तथा माजी शिक्षक आमदार मा.श्रीकांतजी देशपांडे यांचा वाशिम दौरा

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी रणजितसिह. ठाकूर :** स्वराज्यरक्षक स्वराज्याचे दुसरे छत्रपती महापराक्रमी छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती साजरी करून वाशिम जिल्हा दौऱ्याला सुरुवात करण्यात आली.दि.14/05/2026 ला अमरावती विभागाचे माजी राज्यमंत्री दर्जा माजी शिक्षक आमदार माननीय श्रीकांतजी देशपांडे साहेब यांचा वाशिम दौरा आयोजित करण्यात आला होता.वाशिम जिल्हा परिषद मा श्री अर्पित चौहान साहेब मुख्य कार्यकारी अधिकारी वाशिम यांची भेट माननीय श्रीकांतजी देशपांडे साहेब* यांनी *घेतली. खाजगी प्राथमिक शाळेतील शिक्षकांच्या समायोजनाबाबत सविस्तर चर्चा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या सोबत केल्यानंतर त्यांनी समायोजन प्रक्रिया लवकरच राबविण्यात येईल असे आश्वासन दिले.माजी राज्यमंत्री दर्जा तथा माजी शिक्षक आमदार श्रीकांतजी देशपांडे साहेब यांनी नंतर शिक्षणाधिकारी मा धुपे मॅडम माध्यमिक जि प वाशिम* यांची भेट घेतली *त्यामध्ये संच मान्यता ,पोस्टमॅपिंग* इत्यादी विषयावर सकारात्मक चर्चा केली



माजी शिक्षक आमदार माननीय श्रीकांतजी देशपांडे साहेब* त्यानंतर वाशिम *पोलीस अधीक्षक येथे नव्याने रुजू झालेले श्री नितेश जी खाटमोडे पाटील साहेब वाशिम* जिल्ह्यात रुजू झाल्याबद्दल हार्दिक स्वागत करण्यात आले .नंतर *वाशिम जिल्ह्यातील कॉफी प्रकरणात शिक्षकावर झालेल्या एफआयआर संदर्भात माननीय पोलीस अधीक्षक साहेब यांच्याशी सकारात्मक चर्चा करून पुढील मार्ग काढण्याचे माननीय पोलीस अधीक्षक यांनी आश्वासन दिले .

शिक्षक आघाडी वाशिम जिल्ह्यातील दौऱ्यामध्ये शिक्षक आघाडी वाशिम जिल्ह्याचे मार्गदर्शक माननीय श्री दिलीपजी जोशी सर वाशिम जिल्हा शिक्षक आघाडी जिल्हाध्यक्ष श्री रमेश आरु सर शिक्षक आघाडी मार्गदर्शक श्री अढाव सर* जिल्हा उपाध्यक्ष श्री रवि अंभोरे सर निवासी उपाध्यक्ष श्री श्रीकांत जोशी सर* रिसोड तालुकाध्यक्ष श्री घुगे सर वाशिम जिल्ह्यातील शिक्षक आघाडी पदाधिकारी अनेक शिक्षक मॅडम व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते

# कृषी उत्पन्न बाजार समिती आकोट च्या सभापतीपदी धीरज हिंगणकर यांची बिनविरोध निवड !!

**दैनिक युवक आधार**
**दिलीप कराळे/प्रतिनिधी** : : कृषी उत्पन्न बाजार समिती आकोट च्या सभापतीपदी धिरज रमेशराव हिंगणकर यांची अविरोध निवड करण्यात आली आहे. या निवडीमुळे सहकार क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. ३ वर्षापूर्वी बाजार समितीच्या निवडणुकीत सहकार पॅनेलने प्रचंड मताधिक्याने सर्व जागांवर विजय मिळवला होता.



बाजार समिती चे सभापती प्रशांत पाचडे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या जागेसाठी १४ मे रोजी बाजार समितीच्या कार्यालयात निवडणूक प्रक्रिया पार पडली.

या निवडणुकीत धिरज हिंगणकर यांच्या नावावर संचालकांचे एकमत झाल्याने त्यांची बिनविरोध निवड घोषित करण्यात आली. निवडणूक अधिकारी म्हणून सहायक निबंधक रोहीणी विटणकर यांनी काम पाहिले तर बाजार समितीचे सचिव राजकुमार माळवे यांनी त्यांना सहाय्य केले. सभेला माजी सभापती प्रशांत पाचडे, उपसभापती अतुल खोटरे, संचालक विजय राहाणे, रमेश वानखडे, गजाननराव डाफे, रितेश अग्रवाल, कुलदीप वसू, बाबाराव इंगळे, अविनाश जायले, श्रीकांत सपकाळ, सुनिल गावंडे, शंकरराव लोखंडे, श्याम तरोडे, प्रमोद खंडारे सौ. अंजली सोनोने, अजमल खान, सौ. अरुणा आतकड उपस्थित होते.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# शेतकरी आणि सामान्य जनतेच्या अडी-अडचणी सोडविण्यासाठीच महाराजस्व अभियान - तहसीलदार अभय मस्के

**दैनिक युवक आधार**

**एम डी सुरोशे महागाव( यवतमाळ ) :** विविध अडचणींमुळे सरकारी कार्यालयात सहजी कामे मार्गी लागतनाहीत, त्यामुळे नागरिकांची गैरसोयहोते. वेळेचा व पैशाचा अपव्यय होतो.महाराष्ट्र शासनाने छत्रपती शिवाजीमहाराज महाराजस्व समाधान शिबिर हालोकोपयोगी उपक्रम राबवून जनसामान्यांना मोठा दिलासा दिलाआहे. एकाच छताखाली १६ ते १७ विभागशेतकरी आणि सर्वसामान्य जनतेची तत्परतेने कामे करीत आहेत. पंचायत,आरोग्य, शिक्षण, वनविभाग, सहकार,

नझुल, बैंक अशा सर्व विभागांचे प्रमुखजनतेची कामे मार्गी लावण्यासाठी हजरआहेत. या अभिनव उपक्रमाचा सर्वानी लाभ घ्यावा असे आवाहन तहसीलदार अभय मस्के यांनी केले. महागाव तहसील कार्यालयाच्या प्रांगणात आज

आयोजित करण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान तहसीलदार अभय मस्के यांचे प्रतिपादन 5 हजार 793 लाभार्थ्यांनी घेतला लाभ महागाव तहसील कार्यालयाच्या प्रांगणात आयोजित करण्यात आलेल्या महाराजस्य समाधान शिबिराचा लाभ ५ हजार ७९३ लाभार्थ्यापर्यंत पोहोचला. यात शेतकरी, कामगार, विद्यार्थी व सामान्य नागरिकांचा समावेश आहे. शिबिराच्या स्थळी आलेले लाभार्थी आणि कार्यालयात अर्ज



करणाऱ्या लाभार्थ्यांना यावेळी आवर्जून लाभ देण्यात आला. राशन कार्ड, संजय गांधी विभाग, आधार कार्ड, आयुष्यमान कार्ड, विद्यार्थ्यांचे विविध प्रमाणपत्र, कर्ज वितरण प्रमाणपत्र, पांदण रस्त्याचे प्रश्न, रमाई घरकुल अनुदान वाटप, फेरफार, सातबारा, अशा विविध योजनांचा लाभ लाभार्थ्यांना देण्यात आला. शिबिरात अध्यक्षपदावरून ते बोलत होते. या शिबिरासाठी हजारो नागरिकांनी हजेरी लावली होती.विभागाचे आमदार किसनराव वानखेडे, भाजपाचे जिल्हा समन्वयक नितीन भुतडा, ज्येष्ठ नेते संभाजीराव नरवाडे, नगराध्यक्ष रंजनाताई आडे, उपनगराध्यक्ष प्रमोद भरवाडे, नायब तहसीलदार गजानन पराते, वैभव पवार, विजय 1 कोटी 42 लाखांच्या पीक कर्ज वाटप प्रमाणपत्रांचे वितरण सहकारी सोसायटी अंतर्गत जिल्हा मध्यवर्ती बँकेकडून शेतकऱ्यांना १ कोटी ४२ लाख ६१ हजार रुपयांच्या कर्ज मंजुरी प्रमाणपत्राचे वितरण यावेळी करण्यात आले. प्रातीनिधिक स्वरुपात काही शेतकऱ्यांना मंचावर सन्मानपूर्वक प्रमाणपत्रदेण्यात आले. धंदारे, गटशिक्षणाधिकारी संजय कांबळे, पशुसंवर्धन अधिकारी अमित झा, पत्रकार निलेश नरवाडे, महिला बालकल्याण विभागाच्या सुपरवायझर चंद्रकला गजभिये, शकुंतला इंगोले, मंडळ अधिकारी मारोती एकुलवार, सचिन फटाले. बाळासाहेब माने, गोविंद महाराजस्व शिबिराचे नेटके आयोजन ठाकरे, सर्व ग्राम महसूल अधिकारी महागाव महसूल मंडळाच्या या महाराजस्व समाधान शिबिराचे तहसील कार्यालयाच्या प्रांगणात नेटके आयोजन करण्यात आले होते. पाच हजार चौरस फूट मंडपात वातानुकूलित व्यवस्था करून लाभार्थ्यांना सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. नियोजनबद्ध प्रशासकीय सेवेमुळे लाभार्थ्यांनी समाधान व्यक्त केले. महागाव तालुक्यातील इयत्ता दहावी आणि बारावी मध्ये विशेष प्राविण्य प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला. सहाय्यक गटविकास अधिकारी खिल्लारे,वनपरिक्षेत्र अधिकारी देवेंद्र मुनेश्वर,तालुका कृषी अधिकारी अंकुश टकले,उपाधीक्षक भूमी अभिलेख कलावतीजाधव, सहकारी अधिकारी एस.एस.पिंपरखेडे, दुय्यम निबंधक गजानन यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. अभय मस्के म्हणाले की, शिबिरातील प्रत्येक स्टॉलला नागरिकांनी भेटी द्याव्या आणि आपल्या अडीअडचणी सोडून घ्याव्या. नायब तहसीलदार गजानन पराते, वैभव पवार, आरोग्य विभागाचे जळकुटे,समायोचितसहाय्यक गटविकास अधिकारी विजय खिल्लारे यांनी यावेळी मार्गदर्शन केले. नगरसेविका जयश्री नरवाडे यांनी शासनाच्या सेवा ह्या अभियानापुरत्या मर्यादित नसाव्या, प्रशासनाने प्रत्येक दिवशी कार्यालयात येणाऱ्या सर्वसामान्य जनतेची कामे तत्परतेने निकाली काढावी, तरच जनतेचा प्रशासनावर विश्वास दृढ होईल अशी अपेक्षा व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शंकर चव्हाण यांनी केली

# सिल्लोड तालुक्यात सख्ख्या भावाकडून भावाची हत्या; अपघाताचा बनाव फसला, ग्रामीण पोलिसांकडून पर्दाफाश

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : सिल्लोड:- मोटरसायकलवरून पडून अपघाती मृत्यू झाल्याचा बनाव रचून स्वतःच्या सख्ख्या भावाची निर्घृण हत्या करणाऱ्या संशयित आरोपीला सिल्लोड ग्रामीण पोलिसांनी अटक केली आहे. पोलिसांनी केलेल्या तांत्रिक विश्लेषणाअंती आणि घटनास्थळाच्या सूक्ष्म निरीक्षणाने हा धक्कादायक प्रकार उघडकीस आला असून, न्यायालयाने आरोपीला तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

काय आहे घटना?

मिळालेल्या माहितीनुसार, १० मे २०२६ रोजी उपजिल्हा रुग्णालय, सिल्लोड येथून शुभम बालाजी खेळवणे (वय ३०) यांचा मृतदेह पोलिसांना प्राप्त झाला होता. शुभम यांचा मृत्यू दुचाकीवरून पडल्याने झाल्याची प्राथमिक माहिती नातेवाईकांनी दिली होती. त्यावरून सिल्लोड ग्रामीण पोलीस ठाण्यात सुरुवातीला अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली होती. या प्रकरणाचा प्राथमिक तपास पोलीस नाईक सतिष पाटील यांच्याकडे सोपवण्यात आला होता

***तपासात बनाव उघड**

घटनेचे गांभीर्य ओळखून सहाय्यक पोलीस निरीक्षक रविंद्र ठाकरे, पोलीस उपनिरीक्षक घोडे, पोलीस हवालदार आगे व पोलीस नाईक पाटील यांनी ज्या ठिकाणी अपघात झाल्याचे सांगण्यात आले होते, त्या घटनास्थळाची बारकाईने पाहणी केली. तसेच एम.एच. २० जी.एल. ०७२० या क्रमांकाच्या दुचाकीची तपासणी केली असता, घटनास्थळावर अपघाताच्या कोणत्याही खुणा पोलिसांना आढळल्या नाहीत. पोलिसांनी मृताचा भाऊ अतुल बालाजी खेळवणे व आप्पासाहेब खेळवणे यांच्या जबाबांची पडताळणी केली असता, त्यात मोठी विसंगती दिसून आल्याने पोलिसांचा संशय बळावला.

**अशी केली हत्या**

वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण आणि साक्षीदारांची सखोल चौकशी केली असता खळबळजनक माहिती समोर आली. मृत शुभम खेळवणे याला त्याचा भाऊ अतुल खेळवणे याने घरात मारहाण करून खाली पाडले आणि त्याचे डोके जमिनीवर जोरात आपटून त्याला जीवे ठार मारल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. हा खून केल्यानंतर आरोपीने कायदेशीर कारवाईपासून वाचण्यासाठी तपासाची दिशा भरकटवून अपघाताचा बनाव रचला होता.

याप्रकरणी पोलीस नाईक सतिष पाटील यांनी सरकारतर्फे फिर्यादी होऊन आरोपी अतुल बालाजी खेळवणे याच्याविरुद्ध गुन्हा रजिस्टर क्रमांक १५४/२०२६, भारतीय न्याय संहिता कलम १०३, ११५(२) आणि २१७ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी आरोपीला अटक करून प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सिल्लोड यांच्या न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने आरोपीला तीन दिवसांची पोलीस कोठडी मंजूर केली आहे.

सदरची यशस्वी कारवाई उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिनेशकुमार कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक रविंद्र ठाकरे, पोलीस उपनिरीक्षक घोडे, पोलीस हवालदार एस. ए. आगे, पोलीस हवालदार एस. ई. काळे, पोलीस नाईक आर. के. काकडे आणि पोलीस नाईक सतिष पाटील यांनी केली आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक आर. पी. ठाकरे करत आहेत.

# लिटल किंग्स शाळेत धनुर्विद्या प्रशिक्षण शिबिर उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी जयदीप लोखंडे** : लिटल किंग्स इंग्लिश स्कूल, वसमत येथे आयोजित केलेले पाच दिवसीय धनुर्विद्या प्रशिक्षण शिबिर उत्साहात व शिस्तबद्ध वातावरणात पार पडले. या शिबिरामध्ये मुलांना विविध धनुर्विद्या कौशल्यांचे मार्गदर्शन देण्यात आले.

या शिबिराचे विशेष आकर्षण म्हणजे आंतरराष्ट्रीय स्तरावरील तिरंदाज अमोल बोरवाले यांचे मार्गदर्शन. त्यांनी प्रशिक्षण सत्रांमध्ये विद्यार्थ्यांना धनुर्विद्येचे मूलभूत नियम, शिस्त, शरीर संतुलन, लक्ष्य साधना आणि स्पर्धेतील मानसिक तयारी याबाबत सखोल मार्गदर्शन केले. त्यांच्या उपस्थितीमुळे विद्यार्थ्यांमध्ये विशेष उत्साह पाहायला मिळाला.

अमोल बोरवाले यांनी राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक स्पर्धांमध्ये यश संपादन केले असून त्यांनी महाराष्ट्र सरकारच्या क्रीडा प्राधिकरणामध्येही कार्य केले आहे. त्यांच्या अभिनव प्रशिक्षण पद्धतीचा लाभ या शिबिरातील सर्व विद्यार्थ्यांना झाला.

कार्यक्रमात प्राचार्य, शिक्षक व प्रशिक्षक उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवत उत्कृष्ट कामगिरी केली.

या यशस्वी शिबिरासाठी आयोजकांनी तिरंदाज अमोल बोरवाले यांचे विशेष आभार मानले.

# नामदार भरत शेठ गोगावले यांनी नाईक कुटुंबीयांना दिलेला शब्द पाळला

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर):** रोजगार हमी व फलोत्पादन आणि खार जमिनी विकास मंत्री सन्माननीय भरत शेठ गोगावले यांनी नाईक परिवाराला विवाह सोहळ्यास आवर्जून उपस्थित राहतो असा शब्द दिला होता. तो दिलेला शब्द त्यांनी व्यस्त कार्यक्रमातून वेळ काढत पाळून नाईक कुटुंबीयांना सुखद धक्का दिला आहे.

पनवेल जवळील पारगाव कोहली गावात अजय नाईक यांचा विवाह प्रचिती हिच्यासोबत संपन्न झाला. या विवाह सोहळ्याला नामदार भरत शेठ गोगावले यांनी आवर्जून उपस्थित राहून वधू-वरांना शुभाशीर्वाद दिले. या विवाह सोहळ्यामध्ये नामदार भरत शेठ गोगावले यांचे शानदार पद्धतीने स्वागत करण्यात आले या प्रसंगी अहिल्या बाळाराम नाईक सरपंच तथा सदस्य रायगड जिल्हा विकास



समन्वय व सनियंत्रण समिती दिशा अलिबाग रायगड, बाळाराम कृष्णा नाईक शिवसेना उरण संपर्कप्रमुख विधानसभा क्षेत्र उरण पंकज राम नाईक,अजय राम नाईक, पद्माकर कृष्णा नाईक, अनिल कृष्ण नाईक, लक्ष्मण केशव नाईक,विशाल श्याम नाईक, मुकेश श्याम नाईक, आकाश बाळाराम नाईक,स्वप्निल मोरे शिवसेना संघटक उरण, प्रकाश भोईर,कैलास भोईर, रोशन पाटील, निलेश गायकवाड उपसरपंच ओवळे हे उपस्थित होते.

# मोफत योजनांच्या नावाखाली महिलांची लूट; दिव्यज्योत संस्थेचा अडीच लाखांचा घोटाळा”

**दैनिक युवक आधार**

**निफाड राजेश भडांगे तालुका प्रतिनिधी :** निफाड तालुक्यातील विंचूर येथे महिलांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्याचे आमिष दाखवत ‘दिव्यज्योत बहुउद्देशीय संस्था’च्या माध्यमातून सुमारे ६४ महिलांची तब्बल २ लाख ५० हजारांची फसवणूक झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी लासलगाव पोलीस ठाण्यात तीन जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सौ. मनिषा प्रमोद कडलग (वय ३५, रा. लोळगे वस्ती, हनुमान नगर, विंचूर) यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार आरोपी संजय अभिमान बोराळे (वय ४२), दुसरी महिला आरोपी (वय ३५) दोघे रा. सोहम सिटी, लासलगाव तसेच विशाल कान्हू गरूड (वय ३३, रा. कोटमगाव ता. निफाड) यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींचा मूळ पत्ता नांदगाव साकोरे ता. नांदगाव असा असल्याचे पोलिसांनी सांगितले.फिर्यादीनुसार, आरोपींनी विंचूर येथे ‘दिव्यज्योत बहुउद्देशीय संस्था’ स्थापन करून महिलांना मोफत शिवणकाम व ब्युटी पार्लर प्रशिक्षण तसेच केंद्र व राज्य शासनाच्या विश्वकर्मा योजनेअंतर्गत शिलाई मशीन व १५ हजार रुपये रोख मिळवून देण्याचे आश्वासन दिले. याशिवाय पिठगिरणी, वॉशिंग मशीन, फ्रिज यांसारख्या वस्तू केवळ २५ टक्के रक्कम भरून मिळतील व उर्वरित रक्कम शासन अनुदानातून भरली जाईल, असे आमिष मिलांना दाखवण्यात आले. या आश्वासनांवर विश्वास ठेवून फिर्यादी महिलेने गावातील ३० महिलांचा गट तयार करून दिला. आरोपींनी काही महिलांना प्रशिक्षण देत १५ हजार रुपयांचे धनादेशही दिले. त्यामुळे महिलांचा विश्वास अधिक दृढ झाला. त्यानंतर आरोपींच्या सांगण्यावरून विशाल गरूड याने गावोगावी जाऊन महिलांकडून ऑनलाईन फोन-पेच्या माध्यमातून पैसे जमा केले. फिर्यादी महिलेचे २० हजार रुपये तसेच विंचूर येथील सुमारे ६४ महिलांकडून प्रत्येकी ३५०० ते १० हजार रुपयांपर्यंत रक्कम घेण्यात आली. एकूण अंदाजे २ लाख ५० हजार रुपये जमा करूनही महिलांना कोणतीही वस्तू देण्यात आली नाही. उलट वेळोवेळी उडवाउडवीची उत्तरे देत आरोपींनी फसवणूक केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. सदर टोळीकडून निफाड, सिन्नर, येवला व इतर तालुक्यांतील महिलांकडूनही अशाच प्रकारे मोठ्या प्रमाणावर पैसे जमा करण्यात आल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.याप्रकरणी लासलगाव पोलीस ठाण्यात जी.आर. क्र. १५१/२०२६ नुसार भारतीय न्याय संहिता २०२३ कलम ३१६(२), ३१८(४), ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक मोहन पाटील करीत आहेत.

# सामान्य कुटुंबातील दिपांशु देवासेची नागपूर येथील लर्निंग कंपॅनियन फेलोशिप मध्ये निवड

## एजुफेलो हबच्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्याची यशाकडे मोठी गगनभरारी

**दैनिक युवक आधार**

**उमरखेड तालुका प्रतिनिधी राजू गायकवाड (मोहदरी)** : ग्रामीण आणि सामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना योग्य दिशा, संधी आणि मार्गदर्शन मिळावे या उद्देशाने कार्यरत असलेल्या (एजुफेलो हब Edufellow Hub) या विद्यार्थी-केंद्रित प्लॅटफॉर्मसाठी अत्यंत अभिमानाची बाब म्हणजे दिपांशु देवासे याची नागपूर येथील प्रतिष्ठित “लर्निंग कंपॅनियन फेलोशिप” मध्ये निवड झाली आहे.

अत्यंत सामान्य परिस्थितीतून आलेल्या दिपांशुने आपल्या मेहनतीच्या आणि जिद्दीच्या बळावर हे यश संपादन केले आहे. शिक्षण घेण्याची तीव्र इच्छा, स्वतःला घडवण्याची धडपड आणि सतत काहीतरी नवीन शिकण्याची तयारी यामुळे त्याने आज ही महत्त्वाची संधी मिळवली आहे.

या संपूर्ण प्रवासात (एजुफेलो हब Edufellow Hub) ने त्याला सातत्याने मार्गदर्शन, फेलोशिप संदर्भातील माहिती,



मुलाखत तयारी, करिअर सपोर्ट आणि मेंटरिंग उपलब्ध करून दिले. विद्यार्थ्यांना योग्य वेळी योग्य संधी मिळावी आणि ग्रामीण भागातील युवक मुख्य प्रवाहात यावेत यासाठी Edufellow Hub सातत्याने कार्यरत आहे.आज अनेक विद्यार्थी माहितीअभावी Fellowship, Internship, NGO क्षेत्रातील नोकऱ्या आणि Career Opportunities पासून दूर राहतात. हीच दरी कमी करण्यासाठी Edufellow Hub विविध ऑनलाइन मार्गदर्शन सत्रे, करिअर जनजागृती उपक्रम, स्पर्धा आणि विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त संधींची माहिती सातत्याने उपलब्ध करून देत आहे. दिपांशु देवासे याची “लर्निंग कंपॅनियन फेलोशिप” मध्ये झालेली निवड ही केवळ वैयक्तिक यश नसून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी उदाहरण ठरत आहे.

योग्य मार्गदर्शन, मेहनत आणि संधी मिळाल्यास ग्रामीण युवक देखील मोठ्या स्तरावर यश मिळवू शकतात, हे दिपांशुने सिद्ध करून दाखवले आहे.या यशाबद्दल Edufellow Hub परिवाराकडून दिपांशुला शुभेच्छा देण्यात येत असून त्या पुढील वाटचालीसाठी उज्ज्वल भवितव्याच्या शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

# नागपुरात खुनाच्या प्रयत्नातील तीन आरोपी अवघ्या तीन तासांत जेरबंद

## गुन्हे शाखा युनिट क्र . 05 ची जलद कारवाई

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू संपादक नागपूर विभाग :** शहरातील यशोधरा नगर परिसरात खुनाच्या प्रयत्नाच्या गंभीर गुन्ह्यातील तीन आरोपींना अवघ्या तीन तासांच्या आत ताब्यात घेऊन अटक करण्यात नागपूर शहर पोलिसांच्या गुन्हे शाखा युनिट क्रमांक 05 ला यश मिळाले. या जलद आणि प्रभावी कारवाईमुळे नागपूर पोलिसांच्या सतर्कतेची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, यशोधरा नगर पोलीस ठाणे येथे अपराध क्रमांक 377/2026 अंतर्गत कलम 109(1), 115(2), 296, 3(5) भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर घटना दिनांक 13 मे



2026 रोजी पहाटे 1.30 ते 2.00 वाजताच्या दरम्यान घडली होती.

घटनेनंतर गुन्हे शाखा युनिट क्रमांक 05 च्या पथकाने मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे तपासाची चक्रे वेगाने फिरवली. प्राथमिक तपासात रेल्वे पटरीजवळ झोपडा बांधण्याच्या वादातून हा हल्ला झाल्याचे समोर आले. आरोपींचा शोध घेत असताना ते मेडिकल हॉस्पिटल, नागपूर येथे असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पथकाने तत्काळ तेथे धाव घेत तिन्ही आरोपींना ताब्यात घेतले.

**अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये –**

मो. फैजान वल्द मो. अफजल अन्सारी (वय 26 वर्षे), रा. माळा कॉटर, बिलाल नगर, यशोधरा नगर

तोफिक खान उर्फ बाबू वल्द नासिर खान (वय 18 वर्षे), रा. इरा शाळेजवळ, पार्वती नगर, कळमना

मोहम्मद अरबाज वल्द मोहम्मद सुभान अन्सारी (वय 18 वर्षे), रा. मदिना मस्जिदजवळ, माजरी, यशोधरा नगर यांचा समावेश आहे.

तिन्ही आरोपींना गुन्हे शाखेच्या कार्यालयात आणून सखोल चौकशी करण्यात आली असता त्यांनी गुन्ह्यातील सहभाग कबूल केल्याची माहिती पोलिसांनी दिली. त्यानंतर आरोपींची वैद्यकीय तपासणी करून पुढील कायदेशीर कारवाईसाठी त्यांना यशोधरा नगर पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले.या यशस्वी कारवाईमुळे गंभीर गुन्ह्यांचा तात्काळ छडा लावण्यामध्ये नागपूर शहर गुन्हे शाखेची कार्यक्षमता पुन्हा अधोरेखित झाली आहे.

# ४ किमी बंधारा, एकही उघड नाही; साळावची कांदळवने सुकून संपण्याच्या मार्गावर; प्रशासन डोळे बंद?

## वन, महसूल, पोलीस आणि प्रदूषण मंडळाकडे निवेदने; तरीही ठोस कारवाई नाही, गुप्त समझोता?

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे अलिबाग रेवदंडा प्रतिनिधी :** हेक्टर क्षेत्र धोक्यात बंधाऱ्याला उघडी न ठेवल्याने पाण्याचा प्रवाह थांबला, स्थानिक ग्रामस्थ, आरटीआय कार्यकर्त्यांकडून तातडीच्या कारवाईची मागणी. साळाव मे. वेलस्पून मॅक्सस्टील कंपनीने साळाव खाडीच्या किनारी सुमारे ४ किलोमीटर लांबीचा शासकीय बंधारा बांधला असताना त्यात एकही उघड न ठेवल्यामुळे येथे असलेल्या अंदाजे ७०० हेक्टर कांदळवनांचे (मँग्रोव्ह) अस्तित्व अचानक संकटात आले आहे. कंपनीने बंधाऱ्याच्या कामासाठी खारलँडकडून परवानगी घेऊन २ कोटी ४० लाख रुपये गुंतवले असल्याचे नोंद आहे; परंतु परवानगीच्या मर्यादेपेक्षा मोठ्या रुंदीने आणि उंचीने बंधारा तातडीने बदलल्याने खारफुटी परिसरातील झाडे पाण्यापासून वंचित होऊन सुकत आहेत.

स्थानिक सामाजिक आरटीआय कार्यकर्ता प्रमोद नागोठणेकर म्हणतात की, परवानगीमध्ये बंधारा सरासरी सव्वा दोन मीटर उंच व पृष्ठभागावर तीन मीटर रुंदीचा असावा, परंतु कंपनीने तो पृष्ठभागावर ६–७ मीटर रुंदीचा व सरासरी ३ मीटर उंच केला आहे. ३,८३० मीटर लांबीच्या बंधाऱ्याला एकही उघडा न देता बांधल्यामुळे आतमधील कांदळझाडांना समुद्राचे पाणी पोहोचत नाही; परिणामी तिथली मातीतली जैववैविध्य, मासे आणि पक्षी प्रजननस्थाने नष्ट होत आहेत.



कांदळवन हे स्थानिक मासेमारीचे नैसर्गिक प्रजनन केंद्र असून, जवळपासच्या चेहेर, मिठेखार व साळाव गावांच्या लोकांचे उपजीविकेचे प्रमुख साधन मासेमारी आहे. कांदळवनांचे नुकसान म्हणजे स्थानिक समुदायासाठी थेट रोजी रोटीचा प्रश्न. प्रमोद नागोठणेकर आणि ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी, जिल्हा दंडाधिकारी, पोलीस अधीक्षक, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (MPCB), वनपरिक्षेत्र अधिकारी आणि संबंधित प्रशासकीय यंत्रणांमध्ये लेखी तक्रारी व निवेदने दिली आहेत—परंतु अद्याप परिणामकारक कारवाई झाल्याचे दिसत नाही.

ग्रामीणांसोबत केलेल्या वारंवार लेखी तक्रारीना अधिकाऱ्यांकडून "केराची टोपी" दाखवली जात असल्याचा आरोप आहे. कांदळवन कक्षाच्या अहवालानुसार संयुक्त शासकीय स्थळ पाहणी 23 एप्रिल 2026 रोजी करण्यात यायला हवी होती; मात्र प्रत्यक्षात केवळ कांदळवन कक्षानेच एकटा स्थळ पाहणी केल्याचे तक्रारकर्ते म्हणतात. या प्रकरणी पोलीस, महसूल व कांदळवन सेल यांनी कारवाई करण्याचे शिफारस केले असतानाही पदाधिकारी एकमेकांकडे ढकलण्याच्या स्थितीत आहेत.

ग्रामीण व पर्यावरण कार्यकर्ते म्हणतात की, 2010 पासून वेलस्पुन मॅक्सस्टील व नंतर JSW Steel यांसारख्या कंपन्यांनी सलग वर्षांत साळावच्या कांदळवनाचे मोठ्या प्रमाणात नाश केला असून २०१४, २०१९, २०२२ व २०२४/२५ मध्ये वाढत्या कत्तलीने किनारी पर्यावरण, मासेमारी, मानवी जीवन, जैवविविधता आणि भविष्यातील पर्यावरणीय सुरक्षिततेला गंभीर धोका निर्माण झाला आहे. "हे प्रकरण स्थानिक स्तरावर न राहता उच्चस्तरीय प्रशासनाचे प्रश्न उभे करते; संबंधित वरिष्ठ अधिकारीही या प्रकरणात दखल न घेत असल्याचे दिसून येते," प्रमोद नागोठणेकर यांनी म्हटले आहे.

**आता काय होणार?**

स्थानिकांनी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी शेतमाल व मासेमारीवर होणाऱ्या आर्थिक नुकसानीबाबत त्वरित न्याय मागितला आहे.

मागील तक्रारी असूनही प्रशासन व तपास यंत्रणांचा उदासीन प्रवृत्ती कायम राहिली तर व्यापक आंदोलन होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

पर्यावरण व समुद्रकिनार भगव्या क्षेत्राच्या संरक्षणासाठी तातडीने संयुक्त शासकीय तपासणी, बंधाऱ्यावर उघडे ठेवण्याची अंमलबजावणी आणि कांदळवन पुनरुज्जीवन योजनेची मागणी जोरदारपणे केली जात आहे.

**मागणी**

स्थानिक समाज, आरटीआय कार्यकर्ते व पर्यावरणवादी कंपनीने केलेल्या या बंधाऱ्याचे त्वरित निरीक्षण, परवानगीतील बदलांची तपासणी, बंधाऱ्याला उघडे न करणाऱ्या भागाचे ताबा रद्द करणे आणि नुकसानीचे नुकसानभरपाई देण्याच्या तातडीच्या कारवाईची मागणी करत आहेत. तसेच MPCB व वनविभागाने एकत्र येऊन तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी तातडीने करण्यात येत आहे.

प्रशासकीय निष्क्रीयतेवर प्रश्नचिन्ह

सर्वसामान्य नागरिक , ग्रामस्थ व स्थानिक पत्रकार यांचे लक्ष आता केंद्र व राज्य सरकारकडे आहे. हे प्रकरण सामन्यावरून दडपण्याचा प्रयत्न झाला तर जनतेचा तीव्र निषेध निर्माण होईल. सरकारी अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षाबद्दल जबाबदारी घ्यावी आणि दोषींवर कडक कारवाई करण्याचीही तातडीने मागणी केली जात आहे.

# दहावी बारावीचे वर्ष हे विद्यार्थी जीवनाला दिशा देणारे वर्ष – शिक्षक आमदार किरणराव सरनाईक

**दैनिक युवक आधार**

**रिसोड (प्रतिनिधी) -रणजितसिह. ठाकूर** : दहावी बारावीचे वर्ष हे विद्यार्थी जीवनाला दिशा देणारे वर्ष असून हे वर्षच विद्यार्थ्यांचे भविष्य कोणत्या दिशेने जाणार हे ठरविण्यासाठी उपयुक्त ठरते असे प्रतिपादन स्थानिक श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय रिसोड येथे वर्ग दहावी व बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभ प्रसंगी आयोजित कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी स्थानावरून बोलत असताना अमरावती विभागाचे शिक्षक आमदार ॲड किरणराव सरनाईक यांनी केले.



श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय रिसोड येथे दिनांक 15 मे 2026 रोजी इयत्ता दहावी व बारावीच्या बोर्ड परीक्षेमध्ये गुणवत्ता प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते, या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ संचालक पंजाबराव देशमुख हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून श्री शिवाजी शिक्षण संस्था वाशिम चे अध्यक्ष तथा अमरावती विभागाचे शिक्षक आमदार ॲड किरणराव सरनाईक हे होते, तर प्रमुख उपस्थितांमध्ये स्थानिक शाळा समिती संचालक जितेंद्रकुमार दलाल, संजयकुमार जिरवणकर,कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य संजय देशमुख, पर्यवेक्षक गजानन भिसडे, सुधाकरराव देशमुख, श्री शिवाजी प्राथमिक मराठी चे मुख्याध्यापक सचिन देशमुख,उर्दू प्राथमिक चे मुख्याध्यापक अनिस खान हे उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराज व श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे आद्य संस्थापक स्व.ॲड आप्पासाहेब सरनाईक यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले.

त्यानंतर उपस्थित सर्व मान्यवरांचा शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी इयत्ता दहावी व बारावीच्या बोर्ड परीक्षेमध्ये गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांचा त्यांच्या पालकांसह शाळेच्या वतीने मेडल,भेटवस्तू व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

त्यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानिक शाळा समिती संचालक पंजाबराव देशमुख यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आपल्या मार्गदर्शनात पंजाबराव देशमुख यांनी पालकांना आवाहन केले की शक्य होईल तितका आपला पाल्य मोबाईल पासून दूर राहील जेणेकरून त्याला आपल्या भविष्याच्या वाटचालीकडे लक्ष केंद्रित करता येईल याकडे लक्ष द्यावे, विद्यार्थ्यांमधून कु.गायत्री कोल्हे व कु.सबा मरियम देशमुख ह्यानी आपले विचार व्यक्त केले. प्रमुख अतिथी स्थानावरून पुढे बोलताना ॲड.किरणराव सरनाईक म्हणाले की, विद्यार्थ्यांसाठी दहावी व बारावीचे वर्ष अत्यंत महत्त्वाचे वर्ष असते, हे वर्ष त्यांच्या पुढील शैक्षणिक जीवनाला वळण देणारे वर्ष असते. आजच्या काळामध्ये गुणवत्ता जरी वाढली असली तरी स्पर्धाही तितकीच वाढलेली आहे त्यामुळे विद्यार्थ्यांनी न डगमगता आत्मविश्वास व मेहनत करण्याची जिद्द दाखविल्यास त्यांना इच्छित ध्येय गाठण्यास मदत होते, असलेल्या प्रतिकूल परिस्थितीमध्ये कष्ट करून यश मिळविणे हेच खऱ्या अर्थाने जीवनाचे सार्थक आहे असे यावेळी बोलताना ते म्हणाले, शाळेचा उत्कृष्ट निकाल लागल्याबद्दल प्राचार्य संजय देशमुख यांचे ॲड.किरणराव सरनाईक यांनी कौतुक करताना आता आपली जबाबदारी आणखी वाढली आहे, याची दक्षता घ्यावी असेही यावेळी सांगितले व ही परंपरा अशीच कायम ठेवण्याची त्यांच्याकडून अपेक्षा व्यक्त केली.


यावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय आई-वडिलांसह शाळेतील सर्व विषय शिक्षक, प्राध्यापक व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या प्राचार्यांना दिले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य संजय देशमुखयांनी केले तर संचालन प्रा.विजय देशमुख यांनी केले व आभार डिगांबर पाचरणे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# १० वीत ९८ .२०% मिळवणाऱ्या उरणच्या तनिष्कासाठी काकांनी हत्तीच्या पुतळ्यावरून वाटली साखर !

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण / प्रतिनिधी :** "जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर ग्रामीण भागातील विद्यार्थीही गगनभरारी घेऊ शकतात," हे उरण तालुक्यातील धुतुम गावची सुकन्या तनिष्का नितीन ठाकूर हिने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. सेंट मेरी जे एन पीए हायस्कूलची विद्यार्थिनी असलेल्या तनिष्काने दहावीच्या परीक्षेत ९८.२०% गुण मिळवून उरण तालुक्यात द्वितीय येण्याचा बहुमान पटकावला आहे. तिच्या या ऐतिहासिक यशाने संपूर्ण उरण तालुक्यासह धुतुम गावाचे नाव सुवर्णाक्षरांनी कोरले गेले आहे.



'मुलाचे पाय पाळण्यात दिसतात' या उक्तीप्रमाणे तनिष्काने शाळेत पाऊल ठेवल्यापासूनच आपल्या हुशारीची चमक दाखवली .तनिष्का नक्कीच इतिहास रचणार, असा तिचा अभ्यासूपणा पाहून तिचे मोठे काका प्रकाश ठाकूर आणि काकी स्मिता ठाकूर यांना अथांग विश्वास होता. म्हणूनच, "तनिष्काने १० वीत ९० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळवले, तर हत्तीवरून साखर वाटणार!" असा अनोखा निश्चय तिच्या काकांनी केला होता.

तनिष्काने ९८.२०% गुण मिळवून काकांचे हे प्रेमरूपी आव्हान लीलया पेलले. आजकाल प्रत्यक्ष हत्ती मिळणे कठीण असल्याने, तिच्या काकांनी पुतणीच्या या यशाचा आनंद साजरा करण्यासाठी धुतुम गावातील श्री भैरवनाथ देवळाजवळील हत्तीच्या पुतळ्यावर (प्रतीकात्मक हत्ती) बसून खरोखरच साखर वाटली. आणि आपला पण पूर्ण केला .तिच्या कुटुंबाचा हा अनोखा आनंदोत्सव संपूर्ण तालुक्यात चर्चेचा विषय ठरला आहे.

तनिष्काचे हे यश केवळ पुस्तकी ज्ञानापुरते मर्यादित नाही तर ती एक अष्टपैलू विद्यार्थिनी आहे आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्केचिंग चित्रकला स्पर्धेत तिने संपूर्ण भारतात प्रथम क्रमांक पटकावला यासाठी तिला मानाची 'एम एफ हुसेन ट्रॉफी 'आणि दोन चाकी हॉवर बोर्ड देऊन गौरविण्यात आले होते. मैदानातही तनिष्काचा वेगळाच दरारा आहे. किक बॉक्सिंग मध्ये तिने राष्ट्रीय राज्य आणि जिल्हास्तरावर सुवर्ण रौप्य व कांस्य अशी एकूण ३० पदके जिंकून उरणच्या क्रीडा क्षेत्रात एक नवा इतिहास रचला आहे.

अत्यंत अभ्यासू आणि जिद्दी असलेल्या तनिष्काने भविष्यासाठी तंत्रज्ञानाचे सर्वात आधुनिक क्षेत्र निवडले आहे तिला पुढे आरटीफिशियल इंटेलिजन्स 'ए आय' मध्ये डिप्लोमा करायचा आहे तंत्रज्ञानाच्या अत्याधुनिक युगात स्वतःचे करिअर घडवून देशाचे नाव उज्वल करण्याची तिची तीव्र इच्छा आहे. खेडेगावातील एका सामान्य कुटुंबातून पुढे आलेल्या तनिष्काच्या अद्भुत यशामागे तिची आई नमिता नितीन ठाकूर आणि वडील नितीन परशुराम ठाकूर यांचे खंबीर पाठबळ योग्य मार्गदर्शन आणि संस्कार आहेत आपल्या मुलीच्या अथांग यामुळे आई-वडिलांचे डोळे अभिमानाने भरून आले आहेत. तनिष्का भविष्यातही अशीच यशाची शिखरे सर करेल असा विश्वास तिच्या शाळेचे शिक्षक आणि धुतूम ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे.

सध्या तिच्या निवासस्थानी विविध क्षेत्रातील राजकीय सामाजिक आणि शैक्षणिक मान्यवर येऊन तिच्यावर कौतुकाचा वर्षाव करत आहेत यामध्ये प्रामुख्याने सामाजिक कार्यकर्ते परमानंद पाटील, सरपंच सुचिता प्रेमनाथ ठाकूर, सदस्य प्रेमनाथ ठाकूर, माजी उपसरपंच शरद धावजी ठाकूर,सामाजिक कार्यकर्ते जयेश रघुनाथ घरत, थोर समाजसेवक कावीळवाले बाबा चंद्रहास घरत आणि प्रकाश ठाकूर यांचे परममित्र सज्जन ठाकूर आदी मान्यवरांनी तनिष्काच्या घरी प्रत्यक्ष भेट देऊन तिचे विशेष कौतुक केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# रेवदंड्यात प्रामाणिकतेची जिव्हाळ्याची झळाळती किरणे; हरवलेले मंगळसूत्र दोन निष्ठावान महिलांनी सुरक्षित परत केले, रेवदंडा ग्रामपंचायतने दिला अभिमानसन्मान

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे अलिबाग रेवदंडा प्रतिनिधी** : आजच्या काळात माणुसकी आणि प्रामाणिकपणाची खरी परख दिसते तेव्हाच आशा जागते. रेवदंडा पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलिस निरीक्षक भैरू जाधव, रेवदंडा सरपंच प्रफुल्ल मोरे व सदस्य दुष्यंत झावरे यांच्या शुभहस्ते आयोजित विविध मान्यवरांच्या उपस्थितीत सुषमा मंगेश सरपाटील आणि विद्या रुपेश नवरीकर यांचा विशेष सत्कार करण्यात आला. हा सोहळा केवळ पारितोषिक नसून समाजाला प्रामाणिकतेचा दिलासा देणारा एक प्रभावी संदेश ठरला.घटनेची पार्श्वभूमी अशी की, स्थानिक रहिवासींमधील म्हात्रे कुटुंबाने आपले बहुमूल्य मंगळसूत्र हरवल्याचे दुखःद बातमी येताच परिसरात शोककळा पसरली.



अनेक शोधाशोध व गुंतागुंतीच्या प्रयत्नांनंतर दोन निष्ठावान महिलांना भेटलेले मंगळसूत्र प्रामाणिकपणे ते कुटुंबाकडे सुरक्षितपणे परत केले. त्यांच्या या निस्वार्थ व प्रामाणिक वर्तनामुळे पोलीस प्रशासन, कुटुंबीय आणि गावकऱ्यांचे हृदय भरून आले.

सत्कार समारंभात रेवदंडा सहाय्यक पोलिस निरीक्षक भैरू जाधव यांनी म्हटले, "आज इथे जे उदाहरण दिसले आहे ते केवळ दोन महिलांचे नव्हे ते संपूर्ण समाजातील चिरंतन मूल्यांचे आहे. या कृत्यामुळे आपल्याला पुन्हा एकदा आत्मविश्वास आला की या कलियुगातही प्रामाणिकता मर्यादित नाही." रेवदंडा सरपंच प्रफुल्ल मोरे आणि सदस्य दुष्यंत झावरे यांनीही दोघींना पुष्टीवाचन केले व सार्वजनिकपणे त्यांचे गौरवपत्र व पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. कुटुंबीयांनी हळूच डोळे पुसत सांगितले की, मंगळसूत्र परत मिळाल्याने त्यांच्या कुटुंबावरचा दुःखाचा मुकुट निसरा गेला आहे. म्हात्रे कुटुंबाने या दोन महिलांना त्यांचा आभारीपणा व्यक्त करत, त्यांच्या प्रामाणिकपणाला सलाम केला. ग्रामस्थांनीही या कृत्याचे मोठेपणाने कौतुक केले व समाजासाठी हा एक आदर्श प्रकार असल्याचे मत व्यक्त केले.या घटनेचे सामाजिक महत्त्व फार मोठे आहे. आजच्या गर्दीत, तुटत्या नात्यांच्या काळात असे कृत्य लोकांच्या मनात आशेची ज्योत पेटवते. हे दाखवते की प्रामाणिकता ही फक्त कथा किंवा शिक्षणपुस्तकातील शब्द नाही; ती प्रत्यक्षात अस्तित्वात आहे आणि ती पुढच्या पिढ्यांसाठी प्रेरणास्त्रोत ठरू शकते. गावकऱ्यांनी आणि पोलीस प्रशासनाने केलेल्या सत्काराने एक स्पष्ट संदेश गाजला 'चांगुलपणा आणि प्रामाणिकपणा सतत सन्मानास पात्र आहे.'

समारंभानंतरचे दृश्य मनाला भिडणारे होते. गावकरी, पोलीस आणि मान्यवर एकत्र येऊन दोन्ही महिलांचे अभिवादन करत होते. अनेकांनी भावविभोर होऊन त्या दोघींना भरभरून शुभेच्छा दिल्या. सोशल मीडिया आणि स्थानिक मंचांवरही या घटनेचे पैलू जोरदार चर्चेत आहेत; बहुतेक प्रतिक्रिया भावनिक आणि प्रेरणादायी आहेत, ज्यात लोक म्हणतात की अशी उदाहरणे खरा बदल घडवतात.

शेवटी, हा सोहळा केवळ सन्मानपरिषद नव्हे तर समाजाला प्रामाणिकतेचा महत्वपूर्ण संदेश देणारा उत्सवही बनून उभा राहिला. अशी श्रेष्ठ मानवी मूल्ये जपल्याशिवाय समुदायाची खरी उन्नती शक्य नाही आणि आज रेवदंड्यातील हा क्षण याचे जिवंत प्रमाण ठरला.

# ट्रॅव्हल बस आणि थार गाडीचा अपघात

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : ट्रॅव्हल बस आणि थार गाडीचा अपघात झाल्याने बसमधील चालक आणि प्रवासी जखमी झाले. या अपघाता प्रकरणी थार गाडीवरील चालकाविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात 14 मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. फिर्यादी अजय गणपत वाडकर हे जोगेश्वरी, मुंबई येथे राहत असून ट्रॅव्हल्स बस क्रमांक एम एच 04 एम एच 5920 हे प्रवासी घेऊन महाबळेश्वर ते मुंबई असे येत होते .एच एस पी ट्रॅफिक पोलीस चौकी, अजिवली पुणे मुंबई एक्सप्रेस हायवे येथे बस आली असता थार गाडी क्रमांक एम एच 12 वाय एन 0045 वरील चालकाने पनवेल एक्झिट नो एन्ट्री मार्गे रस्त्याच्या विरुद्ध दिशेने गाडी चालवली. आणि धोकादायक स्थितीत एक्सप्रेस हायवेवर वळण घेऊन मुंबई दिशेकडे जात असताना अचानकपणे एक्सप्रेस वरून जाणाऱ्या ट्रॅव्हल्स बसच्या समोर आला आणि ट्रॅव्हल बस आणि थार गाडीचा अपघात झाला. या अपघातात फिर्यादी अजय वाडकर आणि काही प्रवाशांना किरकोळ दुखापती झाल्या. या अपघातात दोन्ही गाड्यांचे नुकसान झाले आहे. याप्रकरणी पनवेल तालुका पोलीस अधिक तपास करत आहेत.

# छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर एकाने स्वराज्य दिले, दुसऱ्याने संविधान दिले दोघेही 'रयतेचे राजा

**■ चिखली नगराध्यक्षांच्या दालनात छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमा विराजमान; 'रयतेचे राज्य' आणण्यासाठी महापुरुषांचे विचारच दिशादर्शक – राजेंद्रजी लहाने**

**■ राजेंद्रजी लहाने, माजी सरपंच राजाराम बरडे यांच्या हस्ते हारार्पण; 'प्रत्येक शासकीय कार्यालयात महापुरुषांचे फोटो लावणे सक्तीचे करावे' – माहिती अधिकार महासंघाची मागणी**



**दैनिक युवक आधार**

**रंगनाथ सावळे पाटील चिखली तालुका प्रतिनिधी** : चिखली नगर परिषदेचे नगराध्यक्ष मा. पंडित दादा देशमुख यांच्या दालनात आज एक ऐतिहासिक व प्रेरणादायी कार्यक्रम संपन्न झाला. माहिती अधिकार महासंघ प्रचारक श्री राजेंद्रजी सर्जेराव लहाने, माजी सरपंच श्री राजाराम बरडे सातगाव भुसारी, नगरपालिका कर्मचारी व कामानिमित्त आलेल्या नागरिकांच्या उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून नगराध्यक्षांच्या दालनात सन्मानपूर्वक विराजमान करण्यात आले.

**विचारांची प्रतिष्ठापना' :**

1. रयतेच्या राजाचे स्वागत : नगराध्यक्ष पंडित दादा देशमुख यांनी सांगितले, "छत्रपती शिवाजी महाराजांनी 'रयतेचे स्वराज्य' निर्माण केले. त्यांच्या राज्यात शेतकरी सुखी होता, स्त्रियांना सन्मान होता, सर्वांना योग्य न्याय मिळत होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'संविधान' देऊन स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या तत्त्वांवर आधुनिक भारताची पायाभरणी केली. या दोन्ही महापुरुषांमुळे आज देश चालतो. त्यांचे फोटो केबिनमध्ये लावणे म्हणजे दररोज त्यांच्या विचारांची आठवण करणे."

2. राजेंद्रजी लहाने यांची भूमिका : माहिती अधिकार महासंघ प्रचारक श्री राजेंद्रजी लहाने म्हणाले, "आज देशात अनेक शासकीय कार्यालयात नेत्यांचे फोटो असतात, पण महापुरुषांचे फोटो नसतात. ज्या महापुरुषांमुळे आपल्याला 'साहेब' ची खुर्ची मिळाली, त्यांनाच आपण विसरलो. छत्रपती शिवाजी महाराजांनी 'अष्टप्रधान मंडळ' नेमून आदर्श कारभार केला. बाबासाहेबांनी 'कलम 14 ते 18' मधून समानतेचा हक्क दिला. जोपर्यंत अधिकारी छत्रपतींच्या 'रयतेच्या कल्याणाचा' आणि बाबासाहेबांच्या 'संविधानाच्या उद्देशिकेचा' विचार करून काम करणार नाहीत, तोपर्यंत गरिबांना न्याय मिळणार नाही.* म्हणून आमची मागणी आहे की, राज्यातील प्रत्येक ग्रामपंचायत, तहसील, पंचायत समिती, नगर परिषद, जिल्हाधिकारी कार्यालयात छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे फोटो लावणे सक्तीचे करावे, असा शासन निर्णय तात्काळ काढावा."

3. माजी सरपंच राजाराम बरडे यांचे मत :* "शिवरायांचे स्वराज्य म्हणजे 'कुळवाडी-भूषण' राज्य. बाबासाहेबांचे संविधान म्हणजे 'शिका, संघटित व्हा, संघर्ष करा'. आज शेतकरी, कष्टकरी, वंचित समाज न्यायासाठी झगडतोय. अधिकाऱ्यांनी हे फोटो पाहून 'मी रयतेचा सेवक आहे' याची जाणीव ठेवावी. फक्त हार घालून उपयोग नाही, विचार आचरणात आणले पाहिजेत."

**शासन निर्णयाची गरज का?**

1. विचारांचे स्मरण : अधिकाऱ्याने खुर्चीवर बसताना समोर छत्रपती व बाबासाहेब दिसले की 'भ्रष्टाचार करू नये, गरिबांना न्याय द्यावा' ही भावना निर्माण होईल.

2.नवी पिढी घडेल : दाखल्यासाठी, कामासाठी येणाऱ्या शाळकरी मुलांना, तरुणांना महापुरुषांची ओळख होईल. प्रेरणा मिळेल.

3. राष्ट्रीय एकात्मता :शिवराय हे शौर्याचे तर बाबासाहेब हे समतेचे प्रतीक. दोघांचे फोटो एकत्र लावल्याने 'मराठा-दलित', 'गाव-शहर' हा भेद मिटेल. 'आम्ही सर्व भारतीय' ही भावना बळकट होईल.

**पुढील दिशा : 'महापुरुष सन्मान अभियान'**

श्री राजेंद्रजी लहाने यांनी जाहीर केले की, माहिती अधिकार महासंघाच्या वतीने 'महापुरुष सन्मान अभियान' राबवले जाईल.

पहिला टप्पा :* चिखली तालुक्यातील 100% ग्रामपंचायत, तहसील, पंचायत समिती कार्यालयात 15 जून 2026 पर्यंत छत्रपती व बाबासाहेबांचे फोटो लावले जातील.

दुसरा टप्पा : मुख्यमंत्री, मुख्य सचिव यांना निवेदन देऊन 'शासकीय कार्यालयात महापुरुषांचे छायाचित्र लावणेबाबत' परिपत्रक काढण्याची मागणी केली जाईल.

"जो अधिकारी महापुरुषांचा फोटो लावणार नाही, त्याच्या केबिनसमोर आम्ही फोटो लावू" असा इशाराही लहाने यांनी दिला.*

कार्यक्रमाला नगरपालिका कर्मचारी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. 'जय जिजाऊ, जय शिवराय, जय भीम' च्या घोषणांनी नगराध्यक्ष दालन दुमदुमून गेले.

---

# उभरते सितारेमध्ये 'नात्यांचे महत्त्व'

**दैनिक युवक आधार**

**राहुल मडावी नागपूर :** उभरते सितारे मंचावर मुलांचा आत्मविश्वास पाहायला मिळतो. आपल्याला तंत्रज्ञानासोबत पुढे जाणे आवश्यक आहे. पूर्वी टीव्हीचे युग होते, आता मोबाईलचे युग आहे. मुलांना आपण हे शिकवायला हवे की, नवीन तंत्रज्ञानाचा योग्य वापर करावा. त्याचा गैरवापर अजिबात करू नये. आज गैरवापर जास्त प्रमाणात होत आहे. हे उदाहरणाद्वारे समजून घेऊया, जसे चॉकलेट किंवा जंक फूडप्रमाणे समजा. ते जास्त खाल्ले तर त्रास वाढतो. तंत्रज्ञानही अगदी तसेच आहे. त्याला जर स्वतःवर जास्त हावी होऊ दिले, तर तुमचे आरोग्य बिघडेल. म्हणूनच थोडा वेळ काढून आपल्या आई-वडिलांसोबत, आजी-आजोबांसोबत वेळ घालवणे, त्यांच्याशी संवाद साधणे आवश्यक आहे. आज चार लोक एकत्र आले तरी मोबाईलवर गेम खेळण्यात व्यस्त होतात. नात्यांना रिचार्ज करणे खूप गरजेचे आहे. असे विचार श्री. शेष



साहू यांनी मुलांना आणि त्यांच्या पालकांना संबोधित करताना व्यक्त केले.

विदर्भ हिंदी साहित्य संमेलनाच्या नवोदित प्रतिभांना समर्पित उपक्रम 'उभरते सितारे'चे आयोजन हिंदी मोर भवन येथील उत्कर्ष हॉलमध्ये करण्यात आले. कार्यक्रमाचा विषय 'नात्यांचे महत्त्व' यावर आधारित असून तो शैक्षणिक, ज्ञानवर्धक आणि संगीतमय सादरीकरणांनी परिपूर्ण होता. कार्यक्रमाला विशेष अतिथी म्हणून डेलॉइट इंडिया प्रायव्हेट लिमिटेडचे ट्रान्सफॉर्मेशन मॅनेजर श्री. शेष राजेंद्र साहू उपस्थित होते. त्यांचा सन्मान संयोजक युवराज चौधरी आणि सहसंयोजिका वैशाली मदारे यांनी स्वागत वस्त्र व स्मृतिचिन्ह देऊन केला.

त्यानंतर सर्व मुलांनीही 'नात्यांचे महत्त्व' या विषयावर सुंदर विचार मांडत अप्रतिम नृत्य आणि गीतांचे सादरीकरण केले. यामध्ये अनुश्री टाले, आरोही पोपलवार, सुकन्या तरार, अलिशा खोब्रागडे, त्रिशिका वाघमारे, जिनीषा भोजवानी, आदित मिंज, सुतिक्ष रामटेके आणि राम बागल यांनी उत्कृष्ट गीत सादर केले. श्री. बागल यांनी आकर्षक नृत्य सादर करून सर्वांना प्रभावित केले.

मुलांच्या सादरीकरणांचे त्यांच्या पालकांसह डॉ. हर्षानंद पोपलवार, रंजना साहू, प्रीती बागल, गीता सुरेश मिंज, संगीता जवाहर तरार, सीमा लूहा, शिवानी लूहा, स्नेहा रामटेक आदींनी भरभरून कौतुक केले. कार्यक्रमाचे कुशल संचालन सहसंयोजिका वैशाली मदारे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रशांत शंभरकर यांनी सहकार्य केले. तसेच उपस्थित सर्व प्रेक्षक, कलाकार आणि मुलांचे आभार संयोजक युवराज चौधरी यांनी मानले.

---

# डिझेल टंचाईमुळे सोयगाव तालुक्यातील शेतकरी संकटात; मशागतीची कामे ठप्प होण्याची भीती

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी विजय काळे :** सध्या सोयगाव शहरासह संपूर्ण तालुक्यात शेतीच्या मशागतीची कामे मोठ्या प्रमाणावर सुरू असून शेतकरी आधुनिक युगात ट्रॅक्टरच्या सहाय्याने शेतीची कामे करत आहेत. मात्र महाराष्ट्रासह देशभरात निर्माण झालेल्या आर्थिक परिस्थितीमुळे पेट्रोल आणि डिझेलच्या पुरवठ्यावर परिणाम झाल्याचे दिसून येत आहे. परिणामी अनेक पेट्रोल पंपांवर डिझेलचा तुटवडा जाणवत असून शेतकरी बांधव मोठ्या अडचणीत सापडले आहेत.

सध्या प्रशासनाच्या आदेशानुसार ट्रॅक्टरमध्ये केवळ २० लिटर तर मोठ्या वाहनांमध्ये २०० लिटर डिझेल देण्याचे निर्देश पेट्रोल पंप चालकांना देण्यात आले आहेत. मात्र शेतीची मशागत, नांगरणी, पेरणीपूर्व तयारी यासाठी ट्रॅक्टरला मोठ्या प्रमाणात डिझेलची आवश्यकता असते. त्यामुळे "२० लिटर डिझेलमध्ये शेतकरी शेतीची मशागत कशी करणार?" असा सवाल शेतकरी बांधवांकडून उपस्थित केला जात आहे.सोयगाव शहरातील प्रतिष्ठित शेतकर डॉक्टर नाना पायघन यांनी सांगितले की, "शेतकऱ्यांसाठी हा अत्यंत महत्त्वाचा हंगाम आहे. मशागतीची कामे वेळेत झाली नाहीत तर पेरणीवर परिणाम होईल.त्यामुळे सरकारने शेतकऱ्यांना विशेष सवलत देऊन अधिक डिझेल उपलब्ध करून द्यावे."दरम्यान भारत पेट्रोलियम तसेच ओम साई पेट्रोल पंपाच्या मालकांशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, "माननीय जिल्हाधिकारी कार्यालयाकडून आम्हाला डिझेल-पेट्रोलचे मर्यादित वाटप करण्याचे आदेश प्राप्त झाले आहेत.उपलब्ध साठा सर्वांना मिळावा यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने इंधन वाटप केले जात आहे."संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क करण्याचा प्रयत्न करण्यात आला मात्र संपर्क होऊ शकला नाही.शिंदे शिवसेनेचे रमेश गव्हांडे यांनी प्रशासनाकडे मागणी करताना सांगितले की,"शेतकरी बांधवांची अडचण लक्षात घेऊन तहसील प्रशासनाने ट्रॅक्टरसाठी स्वतंत्र डिझेल कोटा किंवा विशेष व्यवस्था तातडीने उपलब्ध करून द्यावी."डिझेल टंचाईमुळे सध्या अनेक गावांतील शेतकऱ्यांची मशागतीची कामे खोळंबली असून,वेळेत पाऊस आल्यास पेरणीवर मोठा परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे प्रशासनाने तातडीने लक्ष घालून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा,अशी मागणी सर्व स्तरातून होत आहे.

> **"जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आदेशानुसार आम्ही मर्यादित प्रमाणात डिझेल वाटप करत आहोत. उपलब्ध साठा सर्व शेतकरी व वाहनधारकांना मिळावा यासाठी नियोजन केले जात आहे. डिझेलचा पुरवठा नियमित झाल्यानंतर परिस्थिती पूर्ववत होईल."**
>
> **—एडवोकेट योगेश पाटील,भारत पेट्रोलियम पंप मालक, सोयगाव.**

---

# अपघातात एकाचा मृत्यू

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : ऍक्टिवा मोटरसायकलचा अपघात होऊन 58 वर्षीय इसम गाडीसह दगडावर जाऊन आदळल्याने त्यांचा मृत्यू झाला. या अपघाताप्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात 14 मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. आठ मे रोजी योगेश परशुराम पावशे (वय 36 राहणार तुर्भे, तळोजा) हा त्यांच्या ताब्यातील एक्टिवा मोटरसायकल क्रमांक एम एच ४६ डीबी 2404 वर त्याचे वडील परशुराम शनिवार पावशे (वय 58) यांच्यासह बेलवली येथून नेरे येथे जात होते. यावेळी एक्टिवा मोटरसायकल भरधाव वेगाने चालवून मोटरसायकल आंबिवली-नेरे रोडवर स्मशानभूमीच्या जवळ आला असता रस्ता सोडून रस्त्याच्या बाजूला असलेल्या दगडावर जाऊन आदळली. या अपघातात परशुराम शनिवार पावशे हे गंभीर जखमी झाले. त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यानंतर त्यांचा मृत्यू झाला.

---

# उष्णतेच्या तीव्र लाटेचा हवामान विभागाचा अलर्ट; सकाळी 11 ते 4.30 वाजेपर्यंत सार्वजनिक कार्यक्रमाच्या आयोजनास परवानगी नाही

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू /संपादक नागपूर विभाग :** हवामान विभागाने विभागातील नागपूर व वर्धा जिल्ह्यात संभाव्य उष्णता लाटेच्या ( हीट वेव्ह ) पार्श्वभूमीवर येलो अलर्ट जाहीर केला आहे. या पार्श्वभूमीवर विद्यार्थी, कामगार व नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन विभागीय आयुक्त श्रीमती विजयालक्ष्मी बिदरी यांनी केले आहे.

सध्या तापमानात मोठ्या प्रमाणात वाढ होत असून, उष्णतेच्या लाटेची तीव्रता विभागात नागपूर व वर्धा जिल्ह्यात अधिक राहणार असल्याचे जाहीर केले असून, विभागात करावयाच्या उपाययोजनांबाबत विभागीय आयुक्त विजयालक्ष्मी बिदरी यांच्या अध्यक्षतेखाली विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात विशेष बैठक आयोजित करण्यात आली होती.

हवामान विभागाच्या हीट वेव्ह संदर्भात सकाळी अकरा ते दुपारी साडेचार वाजेपर्यंत नागरिकांच्या संरक्षणासाठी सार्वजनिक कार्यक्रम आयोजित करू नये तसेच विद्यार्थी, कामगार व नागरिकांच्या सुरक्षितेच्या दृष्टीने सर्व आस्थापना व महाविद्यालयांनी आवश्यक उपाययोजना कराव्या असे सक्त निर्देश यावेळी देण्यात आले.

आपत्ती व्यवस्थापन अधिनियमांतर्गत सर्व जिल्हाधिकारी यांनी उष्णतेच्या लाटेच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात उपायोजना राबवताना प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये कोल्ड वार्ड तयार करावे तसेच उष्णतेवर उपचार करण्यासाठी आवश्यक औषधीचा साठा तयार ठेवण्याबाबतही सूचना देण्यात आल्या आहेत.

विभागात मे व जून महिन्यात उष्णते संदर्भात अलर्ट लागू राहणार आहे. उष्माघातामुळे विभागात अतिदक्षता घेताना उष्माघाताच्या रुग्णांवर तात्काळ उपचार होईल याची खबरदारी घेण्यात यावी, उष्मघातासंदर्भात करावयाच्या उपाययोजना सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी जनजागृती करावी तसेच महानगरपालिका क्षेत्रात सेंटर होम सारख्या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात असेही यावेळी बैठकीत सांगण्यात आले.

नागपूर व चंद्रपूर महानगरपालिका क्षेत्रात यासंदर्भात उपाय योजना लागू करण्यात आल्या असून, नागपूर महानगरपालिकेतर्फे प्रत्येक चौकात ग्रीन नेट तसेच आरोग्य केंद्रात आवश्यक सुविधा, शाळा महाविद्यालय, कोचिंग सेंटर आदींना सूचना देण्यात आल्याचे महानगरपालिका आयुक्त डॉ. विपीन इटनकर यांनी यावेळी सांगितले.

नागपूर जिल्ह्यामध्ये उष्णतेच्या लाटेसंदर्भात उपाययोजना लागू करण्यात आल्या असून, या उपाययोजना 16 जून पर्यंत लागू राहतील, असे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी बैठकीत सांगितले. या बैठकीस वर्धा, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली तसेच गोंदिया जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी दूरदृष्टी प्रणालीद्वारे जिल्ह्यात सुरू असलेल्या उपायोजनाबद्दल माहिती दिली.

---

# उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयाच्या भाड़ेवर लक्षावधी रुपये रजनीकांत बोरेले यांची अप्पर मुख्य सचिव कडून वसुलीची मागणी

**दैनिक युवक आधार**

**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी -जितेंद्र खोडे** : पांढरकवडा येथील प्रसिद्ध माहिती अधिकार कार्यकर्ते आणि व्हिसल ब्लोअर रजनीकांत डालूरामजी बोरेले यांनी उपविभागिय पोलीस अधिकारी कार्यालय किती वर्षा पासून भाडे पट्टी वर आहे आणि ऐकून भाडे आज पावतो किती देण्यात आले व इत्यादी अशी माहिती पोलीस विभागातील माहिती अधिकारी यांना एका माहिती अर्ज़ाद्वारे रजनीकांत बोरेले यांनी माहिती मागितली होती.

मागीतलेली माहिती दि.१४-०५-२०२६ रोजी बोरेले यांना प्राप्त झाली. त्यात अतिशय गंभीर बाब पुढे आली आहे. उपविभागीय पोलीस(S.D.P.O.) कार्यालय ऐकून ३८ वर्ष ५, महीने ८ दिवस आज रोजी भाडे किरायाने झाले आहे.

कार्यालयीन अभिलेख उपलब्ध माहिती नुसार दि.०१-११-२०१२ ते ३१-०३-२०२६ पर्यंत १९,०४,२६०/-(ऐकोणीस लक्ष चार हजार दोनशे साठ रुपये) भाडे देण्यात आले हे फक्त उल्लेखनीय तारखे पर्यंताची आहे.सरासरी ६१ महीने ८ दिवसाचे भाडे जवळ पास ७०,००,०००/- (सत्तर लक्ष रुपये ) देण्यात आले जरी असेल तर ३८, वर्षापूर्वी १००० फुट चा भूखंड २०० रुपये प्रमाणे आणि त्यावरील बांधकाम ८,००,०००/- (आठ लक्ष् रूपयाचे ) एकून१०,००,००० /- (दहा लक्ष रुपयात ) सन १९८८ मध्ये उपविभागीय पोलीस अधिकारी यांचा अलीशान कार्यालय सुविधा सह थाटता आला असता.परंतु त्या वेळीचे शाशन



आणि गृह विभागाने अतिशय उत्कृष्ट जावाई शोध लावला " ईजा पायावर आणि मलम पट्टी डोक्यावर" अश्या प्रकार केल्याचे दिसून येते भाडे पट्टीवर लक्षावधी रुपये दिल्याने सामान्य नागरिकांचे पैशयांची उधड़ पट्टी केली करण्यात आली आहे. ज्यांचे कळे पैसा नाही त्यांना विचारा पैशयांची महत्व काय आहे.इथे लोकांचे पैशयांचीच दुरुउपयोग झाला नसून रॉबिनजी बन्सल साहेब हे उपविभागीय पोलीस अधिकारी नसून ते सहाय्यक पोलीस अधिक्षक (I.P.S.) आहेत. सध्या त्यांचा प्रशिक्षणाधिन कार्यकाळ सुरु आहे.रॉबिन बंसल यांचे सुद्धा मनोबल आणि आत्मसन्मान, अस्मिता आणि स्वाभिमानचा खच्चिकरण करूण ठेवले आहे जिल्हा पेक्षा तालुका मोठा // रॉबिन बन्सल साहेब (I.P. S.) यांचा उपविभागीय कार्यालय १३ बाय १५ स्केर फुट ची एक खोली ते पण वरती आणि भाड़े पट्टी वर आणि जिल्ह्यातील अनेक ठाणेदार यांचा कार्यालय १५ बाय २० स्केर फुट मध्ये ते पण भूखंडवर आणि प्रशस्त म्हणजे जिल्हा पेक्षा तालुका मोठा असा विवेकशील ज्ञानचा दाखला शासन देत असल्याचा आरोप रजनीकांत बोरेले यांनी केला असून शक्य तितक्या लवकर उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयचा बांधकाम करावे आणि आज पावेते जवळ पास सत्तर लक्ष रुपये भाडे पट्टीवर खर्च करणाऱ्या अतिबुद्धि जीवी अप्पर मुख्य सचिव गृह विभाग राज्य शाशन यांचे कडून वसूल करुण शासकीय कोषगारात जमा करुण कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी माहिती अधिकार कार्यकर्ते आणि व्हिसल ब्लोअर रजनीकांत डालूरामजी बोरेले करीत आहे

---

# "महसूल प्रशासनाचा दणका; बंद शिवरस्ता झाला अतिक्रमणमुक्त"

**दैनिक युवक आधार**

**राजेश भडांगे निफाड तालुका प्रतिनिधी :** निफाड तालुक्यातील चितेगाव-चेहेडी दरम्यानचा तब्बल ५० वर्षांपासून बंद असलेला शिवरस्ता अखेर अतिक्रमण हटवून वाहतुकीसाठी खुला करण्यात आला. शुक्रवार दि. १५ मे २०२६ रोजी महसूल प्रशासन, भूमी अभिलेख विभाग आणि ग्रामस्तरावरील अधिकाऱ्यांच्या संयुक्त प्रयत्नातून ही कारवाई करण्यात आली. त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.मा. डॉ. शशिकांत मंगरुळे (उपविभागीय अधिकारी), मा. विशाल नाईकवाडे (तहसीलदार, निफाड) तसेच मा. राजेंद्र भाबड (उपाधीक्षक, भूमी अभिलेख) यांच्या आदेशानुसार ही मोहीम राबविण्यात आली. मंडळ अधिकारी जयंत लिलके यांनी संबंधित शेतकऱ्यांची पूर्वबैठक घेऊन रस्त्याचे महत्त्व समजावून सांगितले. त्यानंतर शशिकांत बैरागी (भूमी अभिलेख, निफाड) यांनी रस्त्याच्या



हद्दी व खुणा निश्चित केल्या.यानंतर सुमारे १ किलोमीटर लांबीचा व ९ मीटर रुंदीचा चितेगाव-चेहेडी शिवरस्ता अतिक्रमणमुक्त करण्यात आला. अनेक दशकांपासून बंद असलेला हा रस्ता खुला झाल्याने शेतकऱ्यांची शेतीमाल वाहतूक, शेतीकामासाठीची ये-जा आणि ग्रामसंपर्क अधिक सुलभ होणार आहे.या मोहिमेत ग्राम महसूल अधिकारी शेखर पाटील, अबोली साळवे, कैलास अहिरे, पूर्वा राठोड, पोलीस हवालदार जाधव, संबंधित ग्रामपंचायत अधिकारी तसेच तंटामुक्ती अध्यक्ष दशरथ रूमणे यांनी सक्रिय सहकार्य केले. यावेळी चितेगाव आणि चेहेडी येथील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अभंग निरूपण

निरूपण : ह.भ.प. तुकशीराम लबडे महाराज, अहिल्यानगर

**अभंग :**

१. शिंपियाचें कुळीं जन्म माझा जाला ।
परि हेतु गुंतला सदाशिवीं ॥१॥

२. रात्रीमाजीं शिवी दिवसामाजी शिवी ।
आराणूक जीवीं नोव्हे कदा ॥२॥

३. सुई आणि सुतळी कात्री गज दोरा ।
मांडिला पसारा सदाशिवीं ॥३॥

४. नामा म्हणे शिवीं विठोबाची अंगीं ।
म्हणोनियां जगीं धन्य जालों ॥४॥

शिवी – कापड शिवणे
कुळ – खानदान, घरी, वंश
हेतु – मन, ईच्छा
आराणून – समाधान, शांतता


संत नामदेव महाराज

**शब्दार्थ :**

- शिवी – कापड शिवणे
- कुळ – खानदान, घरी, वंश
- हेतु – मन, ईच्छा
- आराणून – समाधान, शांतता

**आशय :**

जात ,धर्म , काम हे काही विठ्ठल पाहात नाही. देव भावाचा भूकेलेला आहे.

१. शिंपियाचें कुळीं जन्म माझा जाला ।
परि हेतु गुंतला सदाशिवीं ॥१॥
महाराज म्हणतात माझा वंशपरंपरागत कपडे शिवने हा व्यवसाय आहे.
शिंप्याच्या घरात माझा जन्म झाला. पण माझे मन मात्र भगवंतात गुंतले.

२. रात्रीमाजीं शिवी दिवसामाजी शिवी ।
आराणूक जीवीं नोव्हे कदा ॥२॥
रात्री सदा शिव दिवसा सदा शिव यातच मी मम असतो.
सदाशिवाय माझे जीवाला समाधान मिळत नाही.
सदाशिवा शिवाय मला चैन पडत नाही.

३. सुई आणि सुतळी कात्री गज दोरा ।
मांडिला पसारा सदाशिवीं ॥३॥
सुई , दोरा , सुतळी , कापड कापायची कात्री , कापड मोजणीचा गज ,
टाके टाकायला दोरा यातच मी दिवसभर यात असतो.
हा पासारा रात्रंदिवस मांडलेल्लाच असतो.

४. नामा म्हणे शिवीं विठोबाची अंगीं ।
म्हणोनियां जगीं धन्य जालों ॥४॥
नामदेव महाराज म्हणतात शिव भजन मला अंगवळणी पडले आहे.
मी शिव नामाची गुंफन करून भगवंताचा अंगसंग करतो आहे.
म्हणूनच मला जगी धन्यता लाभली आहे.

एकता जीवनात परमेश्वराची अनुभूती आली, एकता मन नामात रंग गेले,
तर — जुनी ओळख, जुने दोष, जुने पाप... यांना काहीच अर्थ राहत नाही!
॥ राम कृष्ण हरी ॥

**शिकवण :**

कोणत्याही जातीत जन्म होवो मन मात्र भगवंतास अर्पण करा.

भगवंत भक्तीने जीवनात धन्यता मिळते.

भक्ती शिवाय जीवाला समाधान मिळत नाही.

नाम घ्या... जीवन बदला...
आणि परमेश्वरात रंगून जा...

# विधानपरिषदेतील नवनिर्वाचित १० सदस्यांचा शपथविधी सोहळा उत्साहात संपन्न

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत विधी पार

**दैनिक युवक आधार**
**ज्योत्सना करवाडे**
**विदर्भ संपादिका** : महाराष्ट्र विधानपरिषदेतील नवनिर्वाचित सदस्यांचा शपथविधी सोहळा आज मुंबईतील विधान भवनाच्या मध्यवर्ती सभागृहात अत्यंत उत्साहपूर्ण आणि दिमाखदार वातावरणात पार पडला. विधान परिषद सभापती Ram Shinde यांनी सर्व नवनिर्वाचित सदस्यांना पद व गोपनीयतेची शपथ दिली. या सोहळ्यास मुख्यमंत्री Deven-dra Fadnavis यांची प्रमुख उपस्थिती लाभली.




या शपथविधी सोहळ्यात भारतीय जनता पार्टीचे Sunil Karjatkar, Pramod Jathar, Sanjay Bhende, Vivek Kolhe, Madhavi Naik तसेच Pradnya Sat-av यांनी सदस्यत्वाची शपथ घेतली.

तसेच शिवसेनेच्या Neelam Gorhe आणि Bac-chu Kadu यांनीही शपथ घेत विधानपरिषद सदस्य म्हणून आपल्या नव्या जबाबदारीची औपचारिक सुरुवात केली. राष्ट्रवादी काँग्रेसचे Zeeshan Siddique तसेच शिवसेना (उबाठा) गटाचे Ambadas Danve यांनीही यावेळी पद व गोपनीयतेची शपथ घेतली.

शपथविधी सोहळ्यादरम्यान विधान भवन परिसरात उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. विविध पक्षांच्या पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समर्थकांनी आपल्या नेत्यांचे अभिनंदन करत जल्लोष साजरा केला. राज्याच्या राजकीय आणि विधिमंडळीन कार्याला अधिक बळकटी देणारा हा सोहळा ठरला.

मुख्यमंत्री Deven-dra Fadnavis यांनी सर्व नवनिर्वाचित सदस्यांचे अभिनंदन करत, "विकसित महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी विधानपरिषद सदस्यांचे योगदान महत्त्वपूर्ण ठरणार असून लोकहिताच्या निर्णय प्रक्रियेत सर्व सदस्य सक्रिय भूमिका बजावतील," असा विश्वास व्यक्त केला.

नवनिर्वाचित सदस्यांच्या शपथविधीनंतर राज्याच्या विकास, लोककल्याण आणि प्रभावी विधिमंडळीन कामकाजासाठी नव्या ऊर्जेने कार्य करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

# महसूल विभागांतर्गत आता केवळ संख्यात्मक नव्हे तर दर्जात्मक सेवांवर भर – मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**मुंबई** : महसूल विभाग सर्वसामान्यांच्या जीवनाशी निगडीत सेवा देणारा विभाग असून अपर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली विभागीय आयुक्तांची समिती नेमण्यात येणार आहे. या माध्यमातून प्रत्येक महिन्यात एक अभियान राबविण्याचे फ्रेमवर्क तयार करण्यात येईल आणि केवळ संख्यात्मक नव्हे तर दर्जात्मक सेवांवर भर देण्यात येईल, असे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियानाबाबत राज्यस्तरीय समितीची बैठक महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झाली. सदस्य आमदार प्रसाद लाड, विक्रांत पाटील, योगेश टिळेकर, अपर मुख्य सचिव विकास खारगे आदी यावेळी उपस्थित होते. समितीचे अन्य सदस्य आमदार ऑनलाईन सहभागी झाले.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, राज्यातील सामान्य नागरिक, शेतकरी आणि विद्यार्थ्यांना महसूल विभागाच्या सेवा गतीने मिळाव्यात यासाठी राबविण्यात येत असलेल्या 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियाना'च्या माध्यमातून नागरिकांना विविध सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध झाल्या आहेत. या अभियानामुळे महसूल विभागाबद्दल जनतेत विश्वासार्हता निर्माण झाली आहे. आगामी काळात विधान परिषद सदस्यांच्या समन्वयाने हे अभियान अधिक व्यापक केले जाईल. आमदार विक्रांत पाटील यांची 'राज्यस्तरीय समन्वयक' म्हणून नियुक्ती करण्यात आली असून ते लोकसहभाग वाढवण्यासाठी ते काम पाहतील.

# स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रुफ टॉप (SMART) सोलार योजना

राज्य शासनाने आर्थिकदृष्ट्या दुर्बल वीज ग्राहकांना वीजेच्या बाबतीत स्वयंपूर्ण करण्यासाठी "स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफ टॉप (SMART) सोलार योजना" लागू केली आहे. या योजनेद्वारे गरीब व अल्प वीज वापर करणाऱ्या घरांना छतावरील सौर ऊर्जा प्रणाली बसविण्यासाठी केंद्र शासनाच्या अनुदानासोबत राज्य शासनाकडून अतिरिक्त आर्थिक सहाय्य दिले जात आहे.

**काय आहे स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रुफ टॉप (SMART) सोलार योजना जाणून घेवू या लेखातून...**

गरीब वीज ग्राहकांना सौर ऊर्जेच्या माध्यमातून वीज खर्चातून मुक्त करणे, अतिरिक्त उत्पन्नाचा स्रोत उपलब्ध करून देणे तसेच राज्यातील छतावरील सौर ऊर्जा निर्मिती क्षमतेत वाढ करणे, हा या योजनेचा उद्देश आहे. यामुळे स्थानिक रोजगारनिर्मिती आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेलाही चालना मिळणार आहे.

**योजनेची संरचना :-** या योजनेंतर्गत दारिद्र्यरेषेखालील सुमारे १ लाख ५४ हजार ६२२ घरगुती वीज ग्राहक तसेच ज्यांचा वीज वार महिन्याला १०० युनिटपेक्षा कमी वीज वापर करणारे ३ लाख ४५ हजार ३७८ आर्थिकदृष्ट्या दुर्बल ग्राहक अशा एकूण ५ लाख घरांना लाभ देण्यात येत आहे.

या योजनेसाठी सन २०२५-२६ या वर्षासाठी रु.३३० कोटी व सन २०२६-२७ या वर्षासाठी ३२५ कोटी इतक्या रकमेची तरतूद करण्यास तसेच या योजनेंतर्गत महाराष्ट्र वीज वितरण कंपनीस सहाय्यक अनुदान वितरित करण्याकरिता नवीन लेखाशिर्ष उघडण्यास मान्यता देण्यात आली आहे.

**योजनेचे उद्दिष्ट :-**

दारिद्र्यरेषेखालील व आर्थिकदृष्ट्या दुर्बल वीज ग्राहकांना सौर ऊर्जेच्या माध्यमातून वीजेच्या बाबतीत स्वयंपूर्ण बनविणे.

दारिद्र्यरेषेखालील व आर्थिकदृष्ट्या दुर्बल वीज ग्राहकांना सौर ऊर्जेच्या माध्यमातून उत्पन्नाचा अतिरिक्त स्रोत निर्माण करुन देणे.

छतावरील सौर ऊर्जा निर्मिती क्षमतेत वाढ करणे.

स्थानिक रोजगाराच्या संधी वाढवणे व अर्थव्यवस्थेचा विकास करणे.

**योजनेसाठी लागणाऱ्या निधीची तरतूद व लेखाशिर्ष :-** SMART योजना राबविण्याकरीता राज्य शासनावर आर्थिक भार रु. ६५५ कोटी येणार आहे. राज्य शासनाच्या अर्थसंकल्पिय अनुदानातून या योजनेसाठी लागणारा निधी देण्यात येईल. तसेच या योजनेंतर्गत महाराष्ट्र वीज वितरण कंपनी मर्यादित यांस सहाय्यक अनुदान वितरित करण्याकरिता नवीन लेखाशिर्ष उघडून या लेखाशिर्षातर्गत सन २०२५-२६ व सन २०२६-२७ या आर्थिक वर्षांमध्ये आवश्यक तरतूद करण्यात आली आहे. ही योजना केंद्र शासनाच्या योजनेशी संबंधित असल्याने केंद्र शासनाच्या योजनेतील पात्रता,अन्य निकषात बदल, सुधारणा झाल्यास त्या या योजनेस लागू राहतील.

**योजनेची अंमलबजावणी :-** या योजनेच्या अंमलबजावणीकरीता महावितरण कंपनी अंमलबजावणी यंत्रणा म्हणून काम करेल.

**लाभार्थी निवडीचे निकष :-**

ग्राहकाकडे वैध वीज कनेक्शन असणे आवश्यक आहे.

ग्राहकाच्या कुटुंबाने छतावरील सौर ऊर्जा प्रणाली आस्थापित करण्यासाठी इतर कोणत्याही अनुदानाचा लाभ घेतलेला नसावा.

इच्छुक ग्राहकाला राष्ट्रीय पोर्टलवर नोंदणी करणे आवश्यक असेल.

वीज ग्राहक थकबाकीमुक्त असणे आवश्यक असेल.

**निकष :-** ज्या वीज ग्राहकांचा वीज वापर वर्ष २०२५ (ऑक्टोबर-२०२४ ते सप्टेंबर-२०२५) मधील कुठल्याही महिन्यांत १०० युनिटपेक्षा जास्त नसेल असेच ग्राहक योजनेस भाग घेण्यास पात्र असतील. फक्त सिंगल फेज वीज ग्राहकच योजनेत भाग घेण्यास पात्र असतील.

दारिद्रयरेषेखालील सर्व ग्राहकांना प्राधान्याने लाभ देण्यात येईल व द्रारिद्रय रेषेखालील ग्राहक वगळता इतर ग्राहकांसाठी सदर योजना "प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य" या तत्वावर राबविण्यात येईल.

डिसेंबर २०२५ पर्यंत योजनेमध्ये दारिद्रय रेषेखालील ग्राहकांची संख्या १ लाख ५४ हजार ६२२ पेक्षा कमी असल्यास हा कोटा ०-१०० युनिट वापर करणाऱ्या ग्राहकांसाठी वळविण्याचा अधिकार महावितरण कंपनीच्या अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना देण्यात आला आहे.

**योजनेचा कालावधी :-** या योजनेचा कालावधी मार्च २०२७ पर्यंत असेल.

**अंमलबजावणी कार्यपध्दती :-** या योजनेची प्रसिध्दी महावितरण कंपनीद्वारे करण्यात येईल. या योजनेसाठी मुख्य कार्यालय स्तरावर निविदा प्रकाशित करण्यात येईल व त्यानुसार पात्र पुरवठादारांना विभागून काम सोपवले जाईल. अर्ज केलेल्या ग्राहकांच्या जागेची तांत्रिक व्यवहार्यता तपासून तेथे छतावरील सौर ऊर्जा प्रणाली आस्थापित करण्यासाठी परवानगी देण्यात येईल.

निविदेत पात्र पुरवठादारांकडून पात्र ग्राहकांना १ कि.वॅ. क्षमतेची छतावरील सौर ऊर्जा प्रणाली बसविण्यात येईल. आस्थापित करण्यात आलेल्या रुफ टॉप सोलर यंत्रणेची तांत्रिक तपासणी महावितरण कंपनीमार्फत करण्यात येईल. नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालय, भारत सरकार यांनी ठरविलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार तसेच तांत्रिक मानदंडानुसार (Technical Specification) सौर ऊर्जा प्रणाली बसविण्याची तसेच योजनेच्या गुणवत्ता नियंत्रणाची जबाबदारी महावितरण कंपनीची राहील. या योजनेंतर्गत वापरण्यात येणारे सोलार मोडयुल्स हे केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री सूर्यघर मुफ्त बिजली योजनेप्रमाणे भारतीय बनावटीचे व आय.ई.सी (EC) प्रमाणित किंवा तत्सम राष्ट्रीय अथवा आंतरराष्ट्रीय मानांकनानुसार प्रमाणित असतील तसेच पुरवठादार हे आर.एफ.आय.डी (RFID) टॅग सुविधेसह पुरविणारे असतील. याबाबत महावितरणद्वारा सामग्री पुरवठादारांकडील सामग्रीची तांत्रिक मानदंडानुसार पाहणी करुन त्यांच्या योग्यतेबाबत खात्री करण्यात येईल. छतावरील सौर ऊर्जा प्रणाली आस्थापित केल्यानंतर ५ वर्षे देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी पुरवठादारांकडे असेल. पुरवठादाराकडून ५ वर्षासाठीचा सर्वकष देखभाल व दुरुस्ती करार (रु.५००/-च्या स्टॅम्प पेपरवर) महावितरणकडून करुन घेण्यात येईल.

नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालय, भारत सरकार यांनी ठरविलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार तसेच तांत्रिक मानदंडानुसार (Technical Specification) सौर ऊर्जा प्रणाली बसविण्याची व गुणवत्ता नियंत्रणाची जबाबदारी महावितरण कंपनीची राहील..

वित्तीय सहाय्य / अनुदानाच्या रकमेची मागणी करुन हा निधी प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही महावितरणमार्फत करण्यात येईल.

योजनेची अंमलबजावणी करताना त्यासाठी आवश्यक असणारे अर्जाचे विहित नमुने, आस्थापना अहवाल, उपयोगिता प्रमाणपत्र व अनुषंगिक बाबी व तांत्रिक तपासणी नमुना इ. महावितरणमार्फत निर्गमित करण्यात येतील.

राज्य शासनाच्या व इतर आर्थिक स्रोतातून महावितरणमार्फत प्राप्त होणाऱ्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र, भौतिक प्रगती व आर्थिक अहवाल दर ३ महिन्यांनी शासनास सादर करणे आवश्यक आहे.अशी आहे ही "स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफ टॉप (SMART SCHEME) सोलार योजना"... गरजू वीज ग्राहकांनी या योजनेचा लाभ जरूर घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

**मनोज सुमन शिवाजी सानप**
**जिल्हा माहिती अधिकारी,ठाणे**

# सोमनाथ 'स्वाभिमान पर्व': श्रद्धेच्या विजयाची आणि भारताच्या सांस्कृतिक पुनरुत्थानाची १००० वर्षे

भारताच्या पश्चिम किनारपट्टीवर, जिथे अथांग अरबी समुद्र भगवान शिवाच्या चरणांचे प्रक्षालन करतो, तिथे उभे असलेले प्रभास पाटनचे सोमनाथ मंदिर केवळ एक वास्तू नाही, तर ते भारताच्या अजेय आत्मसन्मानाचे जिवंत प्रतीक आहे. शिवपुराणात उल्लेखिलेल्या द्वादश ज्योतिर्लिंगांमधील प्रथम स्थान म्हणून सोमनाथाचे महत्व अनन्यसाधारण आहे. परंतु, आज जेव्हा आपण २०२६ या वर्षात पदार्पण केले आहे, तेव्हा हे मंदिर एका ऐतिहासिक कालखंडाचे साक्षीदार म्हणून आपल्यासमोर उभे आहे.



हे वर्ष भारताच्या सांस्कृतिक इतिहासात सुवर्ण अक्षरांनी कोरले गेले आहे. या वर्षाचे महत्व दोन प्रमुख कारणांसाठी आहे. जानेवारी १०२६ मध्ये आक्रमक महमूद गजनीने सोमनाथ मंदिरावर पहिले भीषण आक्रमण केले होते. या घटनेला या वर्षात १००० वर्षे पूर्ण होत आहेत. हे पर्व त्या सर्व वीर आत्मबलिदानांचे स्मरण करण्याचे निमित्त आहे, ज्यांनी या मंदिराच्या रक्षणासाठी आणि अस्मितेसाठी आपल्या प्राणांची आहुती दिली. तसेच मे १९५१ मध्ये स्वतंत्र भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या हस्ते नूतन सोमनाथ मंदिराची प्राणप्रतिष्ठा झाली होती. या ऐतिहासिक घटनेला २०२६ मध्ये ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. म्हणजेच, हे वर्ष सोमनाथ मंदिराच्या 'अमृत महोत्सवा'चेही आहे.

शतकानुशतके परकीय आक्रमकांनी या मंदिराला लुटले, त्याची मोडतोड केली. त्यांचा उद्देश केवळ संपत्ती लुटणे हा नव्हता, तर भारताचा सांस्कृतिक आणि आध्यात्मिक कणा मोडणे हा होता. परंतु, प्रत्येक आक्रमणाने भक्तांची श्रद्धा अधिकच दृढ झाली. जितक्या वेळा हे मंदिर पाडले गेले, तितक्याच जोमाने भारतीयांनी पुन्हा त्याची उभारणी केली.

स्वातंत्र्यानंतर लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांनी सोमनाथच्या पुनर्बांधणीचा जो संकल्प सोडला, तो केवळ एका मंदिराचा जीर्णोद्धार नव्हता, तर तो गुलामगिरीच्या मानसिकतेतून मुक्त होणाऱ्या भारताचा उद्घोष होता. सरदार पटेलांचा हाच वारसा पुढे नेण्याचे कार्य पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली होत आहे. सोमनाथ हे केवळ शिवाचे धाम नाही, तर ते भगवान श्रीकृष्ण आणि शक्तीच्या उपासनेचेही पावन स्थान आहे. हे मंदिर प्राचीन काळापासून भारताचे आर्थिक आणि सांस्कृतिक केंद्र राहिले आहे. येथील 'स्वाभिमान पर्वा'चा उद्देश आपल्या गौरवशाली वारशाची ओळख नव्या पिढीला करून देणे हा आहे. 'स्वाभिमान पर्व' हे केवळ उत्सवाचे साधन नसून, ते आपल्या सामूहिक संकल्पाचे प्रतीक आहे.

सोमनाथ मंदिराची कथा ही विजयाची कथा आहे. अन्यायावर न्यायाच्या, विनाशावर सृजनाच्या आणि अंधारावर प्रकाशाच्या विजयाची. १०२६ मधील त्या काळरात्रीपासून सुरू झालेला हा प्रवास आज २०२६ मध्ये एका वैभवशाली भारताच्या उदयापर्यंत येऊन पोहोचला आहे. सोमनाथचा हा जिर्णोद्धार जगाला सांगतो की, भारत आता केवळ स्वतंत्र झालेला देश नाही, तर तो आपली प्राचीन ओळख आणि वैभव पुन्हा प्राप्त करणारा 'विश्वगुरु' बनण्याच्या मार्गावर असलेले राष्ट्र आहे.

या 'स्वाभिमान पर्वा'च्या निमित्ताने आपण सर्वजण या पवित्र भूमीला नमन करूया आणि राष्ट्राच्या प्रगतीसाठी व संस्कृतीच्या रक्षणासाठी कटिबद्ध होऊया.

**ॲड. आकाश फुंडकर,**
**कामगार मंत्री, महाराष्ट्र राज्य.**